RNI- MAHMAR2003/14666
L/130/RNP/Renewal/2021-23
SHIV VANI
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी
# शिव वाणी
बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २२ वे | अंक २५ | सोमवार दि.३० जुन २०२५ | Mo.9422748792/ 9822628521 | पाने : ४ | किंमत ०३ ₹
Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-22 | Issue -25 | MONDAY DT.30 JUNE 2025 | RNI- MAHMAR2003/14666 | PAGES - 4 | PRICE - 3 RUPEES



बीड – शहरातील राधाकृष्ण मंदिर येथे आज जगन्नाथ यात्रा निमित्त जगन्नाथाचा रथ व पूजा करण्यात आली. यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे, योगेंद्र यादवजी प्रभू, बीड शहरातील भाविक भक्त महिला मंडळ इत्यादी उपस्थित होते.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# कठीण परिश्रमातून मिळालेले यश तुमचे नावलौकिक वाढवते - निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी

## भौतिक सुविधेत न अडकता ज्ञानातून यशाचा मार्ग शोधा – उपविभागीय पोलिस अधिकारी उमाकांत कस्तुरे
## बाजारात गुणवत्तेलाच किंमत असल्याने परिश्रमाशिवाय पर्याय नाही – कार्यकारी अभियंता वासुदेव लबासे
## जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते शानदार सोहळ्यात गौरवले..!



बीड – जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यास मान्यवरांनी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास प्रारंभ केला.



बीड – वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले बीडचे निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी साहेब,बीडचे ग्रह उपविभागीय पोलीस अधिकारी उमाकांत कस्तुरे साहेब, महापारेषणचे कार्यकारी अभियंता वासुदेव लबासे साहेब या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या आणि प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास स्वामी, विश्वस्त श्रीमती रोहिणी मठपती, विलास स्वामी, अशोक स्वामी, सचिव वैभव स्वामी यांच्या शुभहस्ते जगद्विवेक प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय जगदेवी विवेक स्वामी आणि संस्थापक स्वर्गीय विवेक सदाशिव स्वामी प्रतिमेचे पूजन करून गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.









बीड प्रतिनिधी

**पूर्वीच्या परिस्थितीत आणि आत्ताच्या परिस्थितीत अमुलाग्र बदल झालेला आहे.जुन्या पुस्तकावर अभ्यास करून या पदापर्यंत आम्ही आलेलो आहोत. तर आज सोशल मीडिया हातात आल्याने जग तुमच्या बोटावर नाचत आहे.असे असले तरी देखील कठीण परिश्रमातून मिळवलेले यशच तुमचे नावलौकिक वाढवते असे स्पष्ट मत बीडचे निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी व्यक्त केले.**

बीड येथील स.मा. गर्गे भवन येथे रविवार दिनांक २९ जून २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांसह स्कॉलरशिप परीक्षेत बाजी मारलेल्या स्कॉलर विद्यार्थ्यांचा देखील मान्यवरांच्या शुभहस्ते यथोचित गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीडचे निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी लाभले. तर प्रमुख अतिथी म्हणून पोलीस अधीक्षक कार्यालयातील ग्रह उपविभागीय पोलीस अधिकारी उमाकांत कस्तुरे आणि महापारेषण बीडचे कार्यकारी अभियंता वासुदेव लबासे या प्रशासकीय अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तर विशेष अतिथी म्हणून या कार्यक्रमाला प्रतिष्ठानच्या विश्वस्त श्रीमती रोहिणी मठपती पुणे, विलास स्वामी, अशोक स्वामी, जिल्हा सरकारी रक्त पतपेढी मधील श्री ज्योतिबा काळे सर,श्री हनुमंत सावंत सर तसेच प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास स्वामी, सचिव वैभव स्वामी यांची विशेष उपस्थिती लाभली. स्वर्गीय जगदेवी स्वामी आणि स्वर्गीय विवेक स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलाने कार्यक्रमास सुरुवात झाली. सर्वप्रथम व्यासपीठावरील सर्व मान्यवरांना शाल, श्रीफळ, आणि झाड भेट देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पुढे बोलताना निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी म्हणाले की, माझी दहावी १९८५ मध्ये झाली. त्यावेळी मी फर्स्ट क्लास पास झालो. आज विद्यार्थ्यांची गुणवत्ता १००% मध्ये गेली आहे. गुणवत्तेची टक्केवारी नक्कीच वाढली आहे. मात्र या पिढीने वाढलेल्या टक्केवारी सोबतच कठीण परिश्रम कायम केले पाहिजेत. वेळेचे महत्व कायम लक्षात ठेवून आपण वेळेचा योग्य वापर केला पाहिजे. तरच तुम्हाला भविष्यात कायम यश मिळेल आणि नावलौकिक वाढेल असा आशावाद व्यक्त केला. याप्रसंगी विशेष अतिथी पोलीस ग्रह विभागाचे उपविभागीय अधिकारी उमाकांत कस्तुरे साहेब म्हणाले की, अशा गुणगौरव सोहळ्याने विद्यार्थ्यांना स्फूर्ती मिळते. त्यांचा विकास होतो आणि पुढे ते वैभव संपन्न होतात. मात्र यासाठी विद्यार्थ्यांनी देखील भौतिक सुविधेमध्ये न अडकता कायम विद्येचा मार्ग शोधून यशस्वी जीवन जगावे असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. तर महापारेषन बीडचे कार्यकारी अभियंता वासुदेव लबासे म्हणाले, तुमची टक्केवारी किती आणि कशी आली याला कागदावर महत्व नक्कीच असेल मात्र बाजारामध्ये तुमची टक्केवारी नव्हे तर गुणवत्तेचीच किंमत होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता अभ्यासातून, कठीण परिश्रमातूनच वाढवावी आणि यशाचे मानकरी व्हावे असे आवाहन केले. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रतिष्ठानचे सचिव वैभव स्वामी म्हणाले, माझी आई आदर्श मुख्याध्यापिका जगदेवी विवेक स्वामी यांच्या संकल्पनेतून, माझे वडील आदर्श मुख्याध्यापक विवेक स्वामी यांच्या आशीर्वादातून जगद्विवेक प्रतिष्ठानची स्थापना बारा वर्षांपूर्वी करण्यात आली. मागील अकरा वर्षापासून आम्ही सातत्याने आईच्या २५ जून रोजी असलेल्या वाढदिवसाचे आता स्मृतिदिनाचे औचित्य साधून वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करत आहोत. त्याचबरोबर समाजातील ज्या रुग्णाला शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदतीची गरज आहे अशा गरजवंत एका रुग्णाला दहा हजार रुपयापर्यंत प्रतिवर्षी मदत केली जाते. निराधार बेघर यांना मिष्ठान्न दिले जाते. एचआयव्ही बाधित केंद्राला आर्थिक मदत केली जाते.याशिवाय अशा गुणगौरव सोहळ्याच्या माध्यमातून विखुरलेल्या वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी समाजातीलच प्रतिष्ठित अधिकारी अथवा मान्यवर यांना निमंत्रित करून त्यांचे विचार पुढे प्रगतीसाठी एक द्वार व्हावे या हेतूने हा सामाजिक उपक्रम सुरू आहे. असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन सौ जया संतोष स्वामी यांनी केले. तर आभार प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास स्वामी यांनी मानले.

या कार्यक्रमास बीड जिल्हासह परभणी, नांदेड, हिंगोली, जालना, छत्रपती संभाजी नगर, लातूर, धाराशिव, अहमदनगर, पुणे, मुंबई, नाशिक आदी जिल्ह्यातून गुणवंत विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता शानदार अल्पपोहाराने करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विलास स्वामी, अशोक स्वामी,प्रशांत स्वामी, सौ अनिता स्वामी, सौ मीनाक्षी स्वामी, सौ योजना स्वामी, सौ सविता स्वामी, सौ अंजली स्वामी, सौ वनमाला स्वामी, सौ वर्षा स्वामी, सौ जया स्वामी,संतोष स्वामी, राजेश स्वामी, मनोज स्वामी, सर्वेश स्वामी, संजिदा स्वामी,वरद स्वामी, सार्थक स्वामी, श्रावणी स्वामी, सतीश स्वामी, सौ.निर्मला काळे आदींनी अथक परिश्रम घेतले.

## आई–वडिलांच्या नावे सुरू असलेला उपक्रम कौतुकास पात्र...

विकास स्वामी आणि वैभव स्वामी या दोघांनी आई–वडिलांच्या पश्चात देखील त्यांच्या कार्यकाळात सुरू केलेल्या वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा हा खंडित न करता अखंडितपणे सुरू ठेवला.याचे व्यासपीठावरील सर्व मान्यवरांनी आणि उपस्थित गुणवंत विद्यार्थी त्यांच्या पालकांनी कौतुक करून समाजातील एकमेव सातत्याने सुरू असलेल्या या उपक्रमा बद्दल शुभेच्छा व्यक्त करून आनंद व्यक्त केला.

## घरफोडीत सोन्याचे दागिने लंपास; गुन्हा दाखल

परभणी/प्रतिनिधी

गंगाखेड शहरातील मन्नाथ नगर भागात किरायाणे राहणार्या एसटी महामंडळाच्या वाहकाचे घरफोडत चोरट्यांनी ५२ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने लंपास केले. ही घटना गुरुवारी (दि.२६) सकाळी उघडकीस आली. या प्रकरणी अज्ञात चोरट्यावर गंगाखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेविषयी अधिक माहिती अशी की, गंगाखेड शहरातील मन्नाथ नगर भाग १ मध्ये संदीप केंद्रे यांच्या घरात राज्य परिवहन महामंडळाचे वाहक केशव नारायण देवकते हे किरायाणे राहतात. बुधवारी दुपारी देवकते यांचे कुटूंब डोंगर पिंपळा गावी गेले होते. याच दरम्यान अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातून सोन्याची मंगलजोडी, कानातील झुंबर व इतर साहित्य मिळून ५२ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने लंपास केले.या प्रकरणी केशव देवकते यांच्या तक्रारीवरुन अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास बीट जमादार गणेश चनखोरे करत आहेत.

## जमिनीच्या वादातून महिला किर्तनकाराची दगडाने ठेचून हत्या ?

### जमिनीच्या वादातून महिला किर्तनकाराची दगडाने ठेचून हत्या ?

छत्रपती संभाजीनगर : वैजापूर तालुक्यातील चिंचडगाव शिवारातील आश्रमात राहणाऱ्या महिला कीर्तनकार ह.भ.प. संगीता पवार यांची शुक्रवारी रात्री दगडाने ठेचून हत्या झाली. मोहटादेवी मंदिराचे पुजारी शिवाजी चौधरी आश्रम परिसरात आले. त्यावेळी आश्रमाचे कुलूप गेट तोडलेले दिसले. त्यांनी आत जाऊन बघितले त्यावेळी संगीता पवार रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या होत्या. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी हत्येप्रकरणी तपास सुरू केला आहे.

आश्रम बांधण्यासाठी वाळू आणली असता शेजारच्या कुटुंबाने वाद घालत शिवीगाळ केली होती; असे संगीताच्या वडिलांनी, अण्णासाहेब पवार यांनी पोलिसांना सांगितले. त्यांनी वादातून संगीताची हत्या झाल्याचा संशय व्यक्त केला.

चिंचडगावमध्ये २००७ मध्ये दीड एकर जमीन घेतली. तेव्हापासून शेजारचं कुटुंब आमच्याशी वाद घालत होते. त्यानंतर ही जमीन मी मुलगी संगीता हिला दिली. संगीता या जमिनीवर आश्रम बांधणार होती. त्यासाठी जमिनीवर वाळू आणण्यात आली. यावेळी शेजारील कुटुंबाने वाद घातला. चौदा एप्रिल रोजी विरगाव पोलीस ठाण्यात शेजारच्या चौधरी कुटुंबाच्या विरोधात तक्रार दिली. माझ्या मुलीच्या जीवाला धोका असल्याचा देखील उल्लेख केला होता. त्यानंतर माझ्या मुलीची हत्या



झाल्याचे वडील अण्णासाहेब पवार म्हणाले. अण्णासाहेब पवारांनी दिलेली माहिती आणि व्यक्त केलेला संशय याआधी पोलिसांनी चार संशयितांना ताब्यात घेतले आहे. ताब्यात घेतलेल्यांची चौकशी सुरू आहे.



# संपादकीय ...गगन ठेंगणे!

चार दशकांनंतर, बुधवारी, शुभांशू शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाच्या दिशेने झेप घेतली तेव्हा भारताच्या पहिल्या अंतराळवीराच्या आठवणी जाग्या होणे स्वाभाविकच. या मोहिमेवर जाताना शुक्ला यांनी केलेले विधान राकेश शर्मा यांच्या काव्यमय उत्तरासारखे नसले, तरी ते तितकेच महत्त्वाचे आहे.

सारे जहाँ से अच्छा...' हे काव्यमय उत्तर होते, राकेश शर्मा यांचे. ४१ वर्षांपूर्वी त्यांनी जेव्हा अवकाशात झेप घेतली, तेव्हा तिथून भारत कसा दिसतो, हा प्रश्न त्यांना तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी विचारला होता. त्यांनी या प्रश्नाला दिलेले वरील उत्तर हे त्यांच्या अंतराळ मोहिमेइतकेच संस्मरणीय ठरले.

चार दशकांनंतर, बुधवारी, शुभांशू शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाच्या दिशेने झेप घेतली तेव्हा भारताच्या पहिल्या अंतराळवीराच्या आठवणी जाग्या होणे स्वाभाविकच. या मोहिमेवर जाताना शुक्ला यांनी केलेले विधान राकेश शर्मा यांच्या काव्यमय उत्तरासारखे नसले, तरी ते तितकेच महत्त्वाचे आहे. 'हा प्रवास केवळ आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाच्या दिशेने नाही, तर भारताच्या मानवी अवकाश मोहिमेच्या दिशेनेही आहे,' हे शुक्ला यांचे वक्तव्य भारताच्या भावी अवकाश मोहिमांकडे अंगुलिनिर्देश करणारे आहे. शुक्ला यांची अवकाश झेप ही भारताच्या मानवी अवकाश मोहिमांच्या युगाची सुरुवात म्हणावी लागेल.

तब्बल चार दशकांनंतर त्यांच्या रूपाने भारताला दुसरा अंतराळवीर मिळाला असला, तरी यापुढील अंतराळवीरांसाठी आता इतका काळ प्रतीक्षा करण्याची गरज भासणार नाही; कारण येत्या वर्षभरातच 'गगनयान' ही भारताची पहिलीवहिली अवकाश मोहीम कार्यान्वित होईल. त्या मोहिमेची पूर्वतयारी म्हणजे शुभांशू शुक्ला यांची आत्ताची मोहीम. 'ऑक्सिऑम ४' या अमेरिकी मोहिमेत भारताचा सहभाग केवळ शुक्ला यांच्यापुरता मर्यादित नाही, तर अंतराळात भारताकडून प्रयोगही केले जाणार आहेत. भारतीय अवकाश संशोधन संस्थेतर्फे (इस्रो) एकूण सात प्रयोग केले जाणार असल्याने ही मोहीम भारतासाठी महत्त्वाची आहे.

# मुंबई बॉम्बस्फोटांच्या गुन्हेगाराचा ब्रेन हॅमरेजमुळे मृत्यू

**दिल्ली : भारतात दहशत पसरवण्याच्या कटात सहभागी असलेला खडखड चा भारतातील प्रमुख साकिब अब्दुल हमीद नाचन याचा मेंदूत रक्तस्त्राव अर्थात ब्रेन हॅमरेज झाल्यामुळे मृत्यू झाला. नाचन जन्मठेपेची शिक्षा भोगत होता आणि दिल्लीच्या तिहार तुरुंगात होता. तब्येत बिघडल्यामुळे त्याला दिल्लीच्या दीनदयाल उपाध्याय रुग्णालयात नेण्यात आले. तिथल्या डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्याला सफदरजंग रुग्णालयात नेण्यात आले होते. तिथेच नाचनने अखेरचा श्वास घेतला. डॉक्टरांनी तपासणी करुन त्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले.**

साकिब नाचनचा शनिवार २८ जून २०२५ रोजी दुपारी बारा वाजून दहा मिनिटांनी मृत्यू झाला. तो २००२-०३ च्या मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणात दोषी ठरल्यामुळे जन्मठेपेची शिक्षा भोगत होता. सिमी आणि आयसिस या भारतात बंदी घातलेल्या संघटनांसाठी तो काम करत होता. दहशतवादी कारवायांमध्ये त्याचा हात होता.

डिसेंबर २०२३ मध्ये, एनआयएने अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेने त्याला महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील पडघा गावातून इतर १५ जणांसह अटक केली. आयएसआयएसच्या निर्देशानुसार तो बॉम्ब तयार करत होता. भारतात दहशतवादी हल्ल्यांसाठी कट रचणे, हल्लेखोरांना आवश्यक ती मदत पुरवणे ही कामं तो करत होता.

साकिब नाचन तरुणांना 'बयात' म्हणजेच आयसिसच्या खलिफाच्या निष्ठेची शपथ घेण्यास भाग पाडून संघटनेत भरती करत होता. पडघाला मुक्त क्षेत्र घोषित करून त्याने तिथे कट्टर (मूलतत्ववादी) विचार पसरवण्याचे काम सुरू केले होते.

साकिब नाचनच्या नेतृत्वात २००२ - ०३ मध्ये मुंबईत विलेपार्ले, मुलुंड आणि मुंबई सेंट्रल



येथे बॉम्बस्फोट करण्यात आले. या तीन स्फोटांमुळे मुंबई हादरली होती. बॉम्बस्फोटांत १३ जणांचा मृत्यू झाला होता आणि ११६ पेक्षा जास्त नागरिक जखमी झाले होते. या प्रकरणात दहा जणांना दोषी ठरवले होते. दोषींपैकी तिघांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती.



आष्टी तहसील कार्यालयातील महसूल - २ या रिक्त जागेवर नायब तहसीलदार पदाचा पदभार श्री. भगीरथ धारक यांनी स्विकारल्याबद्दल त्यांचा करतांना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. अविनाश कदम, जेष्ठ पत्रकार श्री. राजेंद्र लाड सर, पत्रकार श्री. अक्षय विधाते, पत्रकार श्री. समीर शेख, श्री. संतोष जंपलवार, श्री. अक्षय भोसले दिसत आहेत.

# आदर्श माता - कै.गंगुबाई महाजन

आष्टी (प्रतिनिधी)

कै. गंगुबाई किसन महाजन राहणार महाजनवाडी यांनी वयाच्या ९० व्या. वर्षी अखेरचा श्वास घेतला. त्यांना हृदयविकाराचा तिव्र झटका आल्याने दि. २२ जून २०२५ रोजी भागवत एकादशीच्या दिवशी दुःखद निधन झाले. त्यांच्या पाठीमागे तीन मुले व तीन मुली असा परिवार आहे. महाजन परिवारासाठी व गावासाठी त्या आदर्श माता होत्या. त्यांच्या जाण्याने मुले कारभारी किसन महाजन, गोरक्षनाथ किसन महाजन, मच्छिंद्रनाथ किसन महाजन व मुली



सौ. द्वारका भाऊसाहेब गर्जे, सौ. सविता विजय घोळवे, सौ. सुरेखा विष्णू खेडकर यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. तसेच कै. गंगुबाई महाजन यांना तीन सुना, नातवंडे, परतोंडे असा खूप मोठा परीवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी धामणगाव ता. आष्टी, जि. बीड येथे मंगळवार दि. १ जुलै २०२५ रोजी होणार आहे. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो. हीच ईश्वर चरणी प्रार्थना. तसेच त्यांना दै. समर्थ राजयोग परिवाराकडून भावपूर्ण श्रध्दांजली.

# बीडमध्ये अल्पवयीन विद्यार्थिनीचा लैंगिक छळ

## आरोपींना तात्काळ फाशीद्या

पाटोदा (प्रतिनिधी)

बीड शहरातील उमाकिरण नावाच्या खाजगी क्लासमध्ये शिकणाऱ्या एका अल्पवयीन विद्यार्थिनीच्या सातत्याने लैंगिक छळ झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून, पालकवर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या गंभीर प्रकरणी सावता सेनेच्या बीड जिल्हा अध्यक्षा सौ. स्वातीताई कातखडे यांनी तीव्र संताप व्यक्त करत तत्काळ आरोपींना अटक करून फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी जोरदार मागणी केली आहे.स्वातीताईंनी म्हटले की, अशा विकृत प्रवृत्तीमुळे निष्पाप मुलींचे बालपण उद्धस्त होत आहे. त्यामुळे अशा घटनांना आळा बसावा यासाठी कठोर कारवाई आणि त्वरित न्याय आवश्यक आहे.तसेच, भविष्यात अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी बीड जिल्ह्यातील सर्व खाजगी क्लासेसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे बंधनकारक करण्यात यावे, अशीही मागणी सावता सेनेच्या महिला बीड जिल्हाध्यक्षा स्वातीताई कातखडे यांनी केली आहे.






























































जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा २०२५ थाटात संपन्न..!

# जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा २०२५ थाटात संपन्न..!

बीडचे निवासी जिल्हाधिकारी श्री शिवकुमार स्वामी, बीडचे गृह विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी श्री उमाकांत कस्तुरे, महापारेषण बीडचे कार्यकारी अभियंता वासुदेव लबासे या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले...!!

















# जुन्या पिढीचा इतिहास नवीन पिढीला दिशादर्शक -जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे सन्मान पत्र देऊन कार्याचा गौरव

बीड जिल्ह्यातील कारावास भोगलेल्या ५७ ज्येष्ठांचा सन्मान

बीड (प्रतिनिधी)

लोकशाही मूल्ये, अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी झटलेल्या सर्व जुन्या पिढीचा इतिहास नवीन पिढीला दिशादर्शक आहे. आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेल्या सर्व ज्येष्ठांच्या पाठिशी शासन खंबीरपणे सोबत आहे. आपणास पात्र असलेल्या सर्व सेवा प्रशासनाकडून तत्परतेने देण्यात येतील, असा विश्वास जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज उपस्थितांना दिला.

जिल्हाधिकारी कार्यालयात आणीबाणीच्या काळात लोकशाहीकरिता लढा देताना सामाजिक व राजनैतिक कारणासाठी कारावास भोगलेल्या बीड जिल्ह्यातील ५७ जणांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची स्वाक्षरी असलेले सन्मान पत्र जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याहस्ते आज सन्मानपूर्वक देण्यात आले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवशंकर स्वामी, कारावास भोगलेले विजयकुमार पालसिंगलकर आदींची



मंचावर उपस्थिती होती. १९७५ ते १९७७ काळात लागू केलेल्या आणीबाणीच्या काळात भारतीय लोकशाहीच्या रक्षणासाठी व मुल्याच्या जपणुकीसाठी अत्यंत कठोर परिस्थितीत निडरपणे उभे राहिलात. आपण हुकुमशाहीचा धाडसाने प्रतिकार करून, कारावास स्वीकारून स्वातंत्र्य अभिव्यक्ती आणि लोकशाहीच्या मूल्यांसाठी संघर्ष केला. देशाच्या लोकशाही परंपरेचे रक्षण करण्याच्या या लढ्यातील आपल्या योगदानाचा आम्ही अभिमानाने गौरव करीत आहोत. हे सन्मान पत्र आपल्या त्याग, धैर्य आणि दृढतेला सलाम करण्यासाठी आहे. आपण आपल्या कृतीतून विचारांतून आणि त्यागातून नव्या पिढीसमोर लोकशाही मुल्यांचा आदर्श ठेवला आहे आणि त्याचा आम्हाला अभिमान आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सन्मान पत्रात नमूद केले आहे. प्रातिनिधिक स्वरूपात श्री. पालसिंगलकर, कुसुम सरवदे, उद्धव नागरगोजे, नारायण पांडे, दिलीप सोनवळकर, श्रीमती संजीवनी जोगदंड यांना जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या हस्ते सन्मान पत्र देण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी श्री. स्वामी यांनी सन्मान पत्राचे वाचन केले. तसेच उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# जामखेड नगर रोड येथे अवैध देशी विदेशी दारु विक्री करताना डी वाय एस पी संतोष खाडे यांची कारवाइ

## जामखेड शहरासह तालुक्यात अवैद्य व्यवसायिकांचे धाबे दणाणले आहे...

जामखेड /प्रतिनिधी

परिविक्षाधीन पोलीस उपाधिक्षक संतोष खाडे यांच्या पथकाकडून गेल्या काही दिवसांपासून जामखेड शहरासह तालुक्यात अवैद्य व्यवसायावर धडक कारवाई चालूच आहे. दि २३ रोजी रात्री १०.४५ वाजता जामखेड शहरातील नगर रोडवरील हाँटेल कृष्णा वर धडक छापा टाकला.या छाप्यात विनापरवाना ११०२५ रूपयांची देशी विदेशी दारू पकडण्यात आली. हाँटेल कृष्णा तुकाराम रामराव ढोले यांच्या मालकीचे आहे. पो काँ अमोल श्रीरंग आजबे यांच्या फिर्यादीवरून महाराष्ट्र राज्य दारू अधिनियम कलम ६५ नूसार जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तसेच

अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलीस उपाधिक्षक संतोष खाडे यांच्या पथकाच्या जिल्हाभर कारवाया सूरू आहे.यावेळी पोसई/राजेंद्र



वाघ, सफौ/शकील शेख, पोहेकॉ/शंकर चौधरी, पोहेकॉ/अरविंद भिंगारदिवे, पोहेकॉ अजय साठे, पोहेकॉ/मल्लीकार्जुन बनकर, पोहेकॉ दिनेश मोरे, पोहेकॉ/दिगंबर कारखिले, पोहेकॉ उमेश खेडकर, पोकॉ/सुनिल दिघे, पोकॉ/अमोल कांबळे, पोकॉ/जालिंदर दहिफळे, पोकॉ/दिपक जाधव व पोकॉ/विजय ढाकणे यांचे पथकाने केली आहेत. रात्री पून्हा संतोष खाडे यांनी जामखेडला मोर्चा वळवला आहे. संतोष खाडे यांच्या कधी पायी तर कधी गाडीने करत असलेल्या धडक पेट्रोलिंगची मोठी चर्चा चालू आहे. शहरासह तालुक्यात अवैद्य व्यवसायिकांचे धाबे दणाणले आहे.




हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स, मोंढा रोड,बीड जि.बीड -४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : घर नं.१०२, छत्रपती कॉलनी, क्रांती नगर, तहसीलच्या मागे, बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत).

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT INDRADHANUSHYA PRINTERS & PUBLISHERS, MONDHA ROAD, BEED, DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT H.No.102, CHATRAPATI COLONY, KRANTI NAGAR, TAHASIL BACKSIDE, BEED-431122(MAHARASHTRA) (JURISDICTION AT BEED)

शिव वाणी SHIV VANI



# आता शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी वीज दिवसा मिळणार - आ.सुरेश धस

## आठ वीज उपकेंद्रासाठी ५ आणि १० एम.व्ही.ए. चे ट्रान्सफॉर्मर उपलब्ध

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी मतदार संघात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० अंतर्गत नवीन अतिरिक्त ८ सब स्टेशनला ५ व १० एम. व्ही. ए. चे ट्रांसफार्मर मतदारसंघासाठी उपलब्ध झाले असल्याने यापुढे आता कृषी पंपासाठी शेतकऱ्याला दिवसा वीज पुरवठा होणार असल्याची माहिती आ. सुरेश धस यांनी दिली. याबद्दल मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले आहेत.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० अंतर्गत आष्टी मतदार संघातील ८ सबस्टेशनला ५ एम. व्ही. ए. चे अतिरिक्त नवीन ट्रांन्सफारमर मंजूर होऊन ते मतदारसंघात दाखल झाले असून या सबस्टेशनला उच्च दाबाने पुरवठा होणार आहे. पारगाव जोगेश्वरी, शिराळ, टाकळी अमिया, वाहिरा, पिंपळा तसेच शिरूर तालुक्यातील मानूर टाकळी, तिंतरवणी या सबस्टेशनला अतिरिक्त ५ एम. व्ही. ए. चे तर ब्रम्हनाथ येळंब या सबस्टेशनला १० एम. व्ही. ए. चे ट्रांसफार्मर दाखल झाले आहेत. पाटोदा तालुक्यातील सबस्टेशन प्रस्तावित आहेत तेही लवकर मंजूर होतील. त्यासाठी पाठपुरावा चालू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आता दिवसा वीजपुरवठा होणार असून शेतकऱ्याचा रात्री अपरात्री शेतात जाण्याची गरज राहणार नाही. त्यामुळे होणारे नैसर्गिक अपघात कमी होणार आहेत. विद्युत रोहित्र जळण्याचे प्रमाण देखील कमी होणार आहे. तसेच उच्च दाबाने पुरवठा होणार असून या योजनेअंतर्गत सोलर प्लांट उभारणार असून यातून सबस्टेशन वीजपुरवठा होणार आहे. काही ठिकाणी सोलर प्लॅन्टचे काम प्रगतीपथावर असून जागा संपादनाचे कामे पूर्ण प्रगतीपथावर आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलेला शब्द पाळला - आमदार सुरेश धस



राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांच्या कृषी पंपाला दिवसा पुरवठा करणार. सरकार ने दिलेला शब्द पूर्ण केला. मतदारसंघात दिवसा वीज पुरवठा होणार असल्याने शेतकऱ्याचा जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लागणार असल्याने राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार राज्य सरकारचे आभार व्यक्त करतो.

शेतकऱ्यांना दिलासा

शेतकऱ्याला रात्री अपरात्री पाणी देण्यासाठी येणाऱ्या अडचणी व नैसर्गिक अपघात टाळले जाणारा असून ८ सबस्टेशनला ५ एम. व्ही. ए. चे अतिरिक्त नवीन ट्रांन्सफार्मर मंजूर होऊन ते मतदारसंघात दाखल झाले असून या सबस्टेशनला उच्च दाबाने पुरवठा पारगाव जोगेश्वरी, शिराळ, टाकळी अमिया, वाहिरा, पिंपळा तसेच शिरूर तालुक्यातील मानूर टाकळी, तिंतरवणी या सब स्टेशनला अतिरिक्त ५ एम. व्ही. ए. चे तर ब्रम्हनाथ येळंब या सबस्टेशनला १० एम. व्ही. ए. चे ट्रांसफार्मर दाखल झाले असून मतदारसंघातील शेतकऱ्याला मोठा दिलासा मिळाला असल्याने आ. सुरेश धस यांनी राज्य सरकारचे आभार मानले आहेत.

# भगीरथ धारक साहेबांकडे नायब तहसीलदार पदाचा पदभार

## तालुक्यातील अनेक मान्यवरांकडून शुभेच्छा

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार महसूल - २ बाळदत्त मोरे यांची प्रशासकीय बदली तहसील कार्यालय पाटोदा येथे झाल्याने रिक्त झालेल्या जागेवर आष्टी तहसील कार्यालयातील महसूल सहाय्यकपदी कार्यरत असलेले भगीरथ चंद्रभान धारक यांच्याकडे बाळदत्त मोरे यांचेकडील नायब तहसीलदार महसूल - २ या महत्त्वपूर्ण विभागाचा प्रभारी कार्यभार सोपवण्यात आला आहे. भगीरथ धारक हे अत्यंत कार्यक्षम आणि लोकाभिमुख कर्मचारी असून आष्टी तहसील कार्यालयातील कामकाज त्यांच्या कार्यपद्धतीमुळे वेगवान होईल असे बोलले जात आहे.

श्री. भगीरथ धारक यांच्याकडील या अतिरिक्त पदभारा बाबतचा आदेश तहसीलदार श्रीमती वैशालीताई पाटील यांनी दि. २५ जून २०२५ रोजी दिला असून भगीरथ धारक यांनी नवीन पदभार स्वीकारल्यानंतर त्यांचे आ. सुरेश धस, विजय गोल्हार, तहसिलदार वैशाली पाटील, नायब तहसिलदार सिरसेवाड, उध्दव बापू दरेकर, यशवंत खंडागळे, माजी सभापती अंकुश चव्हाण, विजय खाकाळ, डा. राजेंद्र जरांगे, रामशेठ मधुरकर, सतीष शेठ



धस, संतोष जंपलवार, सुनिल सुर्यवंशी, जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, दै. झुंजार नेताचे उपसंपादक उत्तम बोडखे, आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, पत्रकार अक्षय विधाते, पत्रकार समिर शेख, पोपट घुले, नामदेव राऊत, राजेंद्र लाड, नंदकुमार कदम, डा. अभिजीत सायंबर, रविंद्र ढोबळे, दत्ताभाऊ बोडखे, गणेश धुमाळ, स्वप्निल जोगदंड, सोनु बांगर, प्रशांत शिंदे, अमोल जगताप, संपत सायकड, अरुणभैय्या निकाळजे, सादिक कुरेशी, शफीभाऊ सय्यद, जालींदर वांढरे, बाळासाहेब थोरवे, मोसीन शेख, राजु मुटकुळे, अक्षय भोसले, आजिनाथ शेळके, चंद्रभान वामन, लालु शेळके, भगवानराव गायकवाड, राजाभाऊ शेळके, सुरेश चव्हाण, आशोक चव्हाण आदिंनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती पुरोहित कल्याण समितीच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल केज

# पुरोहित बांधवांच्या वतीने श्रीनिवास केजकर यांचा सत्कार



केज/प्रतिनिधी

समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती पुरोहित कल्याण समितीच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल पुरोहित बांधवाकडून केज शहरातील बालाजी मंदिर येथे श्रीनिवास केजकर यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी अनंत देवा कोकीळ, चिन्मय कुलकर्णी अमृत चे प्रतिनिधी,महेश कुलकर्णी,हरिभाऊ कुलकर्णी,धनंजय कुलकर्णी,बाळासाहेब कुलकर्णी उमरीकर, सोमेश्वर कुलकर्णी, उद्धव रामदासी, ऋषिकेश पाटील, श्रीपाद अयाचित, गुणवंत जोशी आदी पुरोहित बांधव यावेळी उपस्थित होते.यावेळी बोलताना समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीचे संस्थापक श्री. धनंजय कुलकर्णी यांनी श्रीनिवास केजकर यांचे स्वागत करताना सांगितले की,श्रीनिवास केजकर यांच्यावर पुरोहित समाज बांधवांच्या अडचणी सोडविण्यासाठी साठी मोठी जबाबदारी दिली असून समाजाच्या उन्नतीसाठी सदैव तत्पर रहावे असे आवाहन केले.तसेच पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.आभार प्रदर्शन उद्धव रामदासी

# पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रातील ३३ युवकांना विषबाधा

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी शहरात एक खाजगी भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र चालवले जाते. या केंद्रात शुक्रवार (दि. २७) रोजी रात्रीच्या जेवणामुळे ३३ युवकांना विषबाधा झाली आहे. या अकॅडमीत आष्टी तालुक्यासह इतर तालुक्यातील शेकडो युवक पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण घेत आहेत. शुक्रवारी रात्री जेवल्यानंतर मध्यरात्री दोनच्या सुमारास विद्यार्थ्यांना जुलाब व उलटी होऊ लागली. सगळ्याच युवकांना त्रास होऊ लागल्याने उपचारासाठी आष्टी ग्रामीण रूग्णालयात दाखल केले. यातील २० युवकांना अहिल्यानगर येथे पुढील उपचारासाठी पाठविले आहेत. या घटनेची सखोल माहिती आ. सुरेश धस यांनी घेतली असून सर्वांची आस्थेवाईकपणे चौकशी केली आहे.

अधिक माहिती अशी की, आष्टी शहरातील एका खाजगी अकॅडमीमध्ये भरतीपुर्व प्रशिक्षणासाठी अनेक विद्यार्थी आहेत. त्यांना नेहमीप्रमाणे शुक्रवार (दि. २७) रोजी रात्री ९ च्या सुमारास जेवण दिले. यामध्ये हुलग्याची भाजी, भाकरी, भात दिला. परंतु मध्यरात्री दिडच्या सुमारास काही युवकांना जुलाब व

## २० विद्यार्थी अहिल्यानगरला हलविले घटनेची सखोल माहिती आ.सुरेश धस यांनी घेतली



उलटीचा त्रास होऊ लागला. हळूहळू सर्वच युवकांना त्रास होऊ लागल्याने त्यांना ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. यातील काही युवकांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना उपचारासाठी अहिल्यानगर येथे पाठविण्यात आले आहे.

या विषबाधेचा त्रास अभिजीत अंगद शेळके, विकास आप्पासाहेब धुमाळ, सायली बाळू मांडगे, शिवाजी भाऊसाहेब धनवडे, आकाश आप्पा बांगर, सनी मोहन डफाळ, सुभाष खंडू धोत्रे, गोकुळ नाथा धुमाळ, सुभाष सोमीनाथ धोत्रे, कृष्णा सुरेश पांडुळे, रोहन संजय शेळके, प्रणव सर्जेराव भोसले, ऋषिकेश रामदेव खाडे, गणेश संजय नरवडे, आकाश रावसाहेब डफळ, विकास साहेबा फुलमाळी, रोहित बजरंग जगताप, गौरी काकासाहेब पाटील, विद्या विजय बोराडे, नेहा अशोक बारखेड, रोहित धर्मराज धनवडे, करुणा संतोष खंडागळे, रोहित रामभाऊ रोडे, अशोक उत्तम शेळके, विमल सुदाम देशमुख, मनीषा सायकड, प्रज्वल काकडे, सुनिता महात्माजी वाहटुळे, अनिरुद्ध बापूराव मिसाळ, मंगल संभानी भोंगाळे, करण महादेव शेळके, राम प्रकाश गोरख गजघाट, हर्षद बबन कदम, देवकाते मयुर भीमसेन, कुदनाने किरण भाऊसाहेब, राहुल कैलास साबळे, आसिफ इनुस शेख, राम प्रकाश शिंदे, अशोक गवाजी रूपकर, आयान पठाण यांना झाली आहे. सर्व प्रशिक्षणार्थींची प्रकृती स्थिर आहे. नेमकी विषबाधा का झाली याची चौकशी करू, ज्या युवकांची प्रकृती गंभीर आहे त्यांना पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे पाठविले आहे. सर्व युवकांना वेळेत उपचार मिळाल्याने काळजी करण्याचे कारण नाही असे तहसिलदार वैशाली पाटील यांनी सांगितले आहे.

# यशाचे मुल्यांकन निर्धारावर अवलंबून असते

उदगीर (प्रतिनिधी)

कोणतेही यश अथवा अपयश अंतिम नसते.यशाचं मुल्यांकन आपल्या मनातील निर्धारावर अवलंबून असते.असे उद्गार भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त लाल बहादूर शास्त्री शैक्षणिक संकुल उदगीर आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात लातूर चे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी गुणवंतांना संबोधित करतांना काढले.

लाल बहादुर शास्त्री शैक्षणिक संकुलाच्या वतीने शालांत प्रमाणपत्र परीक्षेत तसेच विविध शालेय व अन्य स्पर्धेत गुणवंत ठरलेल्या विद्यार्थांचा तसेच उपक्रमशील पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक व शिक्षकांचा सत्कार सोहळा उदगीर येथील राधेकृष्ण मंगल कार्यालयात संपन्न झाला.सत्कार सोहळ्याचे अध्यक्ष भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे पोलीस अधीक्षक डॉ सोमय मुंडे, शल्यचिकित्सक डॉ.विनायक मुंडे, शिलाताई आलूरकर, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार,कार्यवाह शंकरराव लासुणे,लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहूल केंद्रे,भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे ,डॉ. प्रकाश येरमे, शालेय समितीचे अध्यक्ष सतनप्पा हुरदळे , व्यंकटराव गुरमे, प्रशांत राजूरकर,अंजलीताई नळगीरकर, चंद्रकांत धनबा,मुख्याध्यापक संजय कुलकर्णी प्राथमिकचे मुख्याध्यापक अंकुशराव मिरगुडे प्राचार्य श्रीपाद सिमंतकर उपस्थित होते.

याप्रसंगी शालांत प्रमाणपत्र परीक्षेत शंभर टक्के प्राप्त गुण घेतलेल्या सहा व नव्वद टक्केच्या वर गुण प्राप्त केलेल्या अठ्यान्नव विद्यार्थांचा,एन एम एस परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थी,इंडियन ऑलिंपियाड स्पर्धा परीक्षेत गोल्ड मेडल व




स्कॉलरशीप प्राप्त,संसद स्कूल संसद स्पर्धेत तृतीय क्रमांक व पंतप्रधान पद मिळवणारी अक्षरा दुरूगकर,वेगवेगळ्या क्रीडा प्रकारात बक्षीसप्राप्त ,निबंध स्पर्धा, संस्कृती संवर्धन स्पर्धत व एन सी.सी बेस्ट कॅडेट उपक्रमात बक्षीसप्राप्त विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच शंभर शिक्षक क्लब जालन्यातील संस्थेचा पुरस्कार प्राप्त करणारे मुख्याध्यापक संजय कुलकर्णी, जिल्हास्तरीय आदर्श पुरस्काराने सन्मानित झालेल्या नीता मोरे, दहावी विभाग प्रमुख रामेश्वर मलशेट्टे, सहप्रमुख श्रद्धा पाटील यांचाही मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला.

पोलीस अधीक्षक डॉ. सोमय मुंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की ,यशस्वी विद्यार्थ्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो.परंतु यश कायम टिकवायचे असेल तर आपल्या प्रयत्नात सातत्य असणे गरजेचे आहे. कोणतेही यश एका रात्रीतून मिळत नसते.यशासाठी मनाचा निर्धार पक्का असावा लागतो. तोच माणूस यशस्वी होऊ शकतो की जो रोजचा दिवस जिंकतो. जीवनात आलेलं अपयश मोठ्या ताकदीने पचवणारी माणसचं भविष्यात कर्तृत्ववान होऊ शकतात. म्हणून यशाबरोबरच आपण अपयश पचवायला शिकले पाहिजे. ध्येयपूर्तीसाठी एक दिवसही वाया न घालवता तुम्ही प्रयत्नशील असले पाहिजे तरच यश हे तुमच्या पुढ्यात उभं राहू शकते.असा मौलिक सल्ला दिला.

देगलूरचे प्रसिद्ध शल्यचिकित्सक व सोमेय मुंडे यांचे वडील डॉ. विनायक मुंडे यांनी संस्थेबद्दल गौरवोद्गार काढून भारतीय शिक्षण प्रसारक संस्था गुणवत्तेचे शिखर पदाक्रांत करीत असल्याचा आनंद व्यक्त करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. तर अध्यक्षीय समारोपात डॉ. सुरेंद्र आलूरकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना म्हणाले की, विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाचे नियोजन करून त्यात सातत्य ठेवले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या यशाबरोबरच पालक व शिक्षकांचेही कष्ट महत्वपूर्ण ठरतात आणि त्यामुळेच आपल्या सगळ्यांच्या प्रयत्नातून संस्थेचा नावलौकिक वाढतो. ही आमच्यासाठी अभिमानास्पद बाब असून विद्यार्थ्यांनी समाजासाठी राष्ट्रासाठी सामाजिक भान जपलं पाहिजे. असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी पडलवार, प्रीती शेंड

# ग्रामस्थांनी मागणी करताच आ.सुरेश धस यांनी ११ विद्युत रोहित्र केले उपलब्ध

## विजेचा प्रश्न मार्गी लागल्याने आ.सुरेश धस यांचे मानले आभार ;गावात मिरवणूक काढत वाजतगाजत केले स्वागत

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी विधानसभा मतदार संघातील चिखली या गावाला ओव्हरलोड वीज विद्युत रोहित्रामुळे पूर्ण क्षमतेने वीज पुरवठा होत नव्हता. आ. सुरेश धस यांच्याकडे ग्रामस्थांनी मागणी करताच पाठपुरावा करून गावठाण अंतर्गत ११ विद्युत रोहित्रांना मंजुरी मिळाली असून विद्युत रोहित्र उपलब्ध करून दिले. तात्काळ उपलब्ध केलेल्या रोहित्राची ग्रामस्थांनी गावात वाजतगाजत मिरवणूक काढत जंगी स्वागत करत राज्य सरकार व आ. सुरेश धस यांचे आभार मानले.

आ. सुरेश धस आष्टी विधानसभा मतदार संघाच्या सर्वांगीण विकास करतांना रस्ते, पाणी, आरोग्य या बरोबरच विजेच्या समस्या देखील सोडविण्यासाठी कटिबद्ध असल्याने ओव्हरलोड वीज रोहित्रामुळे येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी नवीन वीज रोहीत्रांना मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आ. सुरेश धस यांचा पाठपुरावा सुरु होता. वीज हा शेतकऱ्यांसाठी अतिशय जिव्हाळ्याचा प्रश्न असून कृषी पंपांना नियमित पूर्ण क्षमतेने वीज पुरवठा व्हावा हि प्रत्येक शेतकऱ्यांची अपेक्षा असते. परंतु त्याच ट्रांसफार्मरवर कृषी पंप व गावठाण अंतर्गत घर वापर वीज त्यामुळे वीज रोहित्र ओव्हरलोडमुळे कायम नादुरुस्त होत असल्यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. याची दखल घेवून यापूर्वी देखील ओव्हरलोड वीज रोहीत्रांवर असलेला लोड कमी करण्यासाठी आ. सुरेश धस यांनी नवीन ११ रोहित्रांना मंजुरी मिळवून या गावात बसविले जाणार आहेत. तात्काळ उपलब्ध केलेल्या रोहित्राची



ग्रामस्थांनी गावात वाजतगाजत मिरवणूक काढत जंगी स्वागत केले. आगळ्या वेगळ्या पद्धतीने आमदार सुरेश धस यांचे आभार मानले. ११ ट्रांसफार्मर १०० केव्ही चे गावाला मिळाले आहेत. यामुळे पुढील २५ वर्ष विज ग्राहकांना विजेचा प्रश्न भासणार नाही. या गावातील ओव्हरलोड वीज रोहीत्रांवर असलेला लोड कमी होण्यास मदत होवून त्यामुळे शेतकऱ्यांना पूर्ण क्षमतेने सुरळीत वीज पुरवठा होण्यास मदत होणार आहे. त्याबद्दल या गावातील शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, आ. सुरेश धस यांचे आभार मानले आहेत.

यावेळी महादेव शिंदे, गणेश शिंदे, शिवाजी आवारे, नवनाथ चखाले, शांतीलाल घोलप, शहाजी कोकणे, गौतम चखाले, दत्ता कोकणे, दत्तात्रय गोयकर, अब्बास शेख, कांता टकले, दत्तु टकले, रतन शिंदे, शिवाजी घोलप, रमजान पठाण, हमीद शेख, अण्णा तांबे, गोरख कोकणे, बंडू कोकणे, भैरू तांबे, भाऊ शिंदे, आत्माराम आवारे, बंडू कोकणे, अशोक मांडगे, लक्ष्मण सापते, विलास गोयकर, देविदास तांबे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.आष्टी विधानसभा मतदार संघातील चिखली या गावाला ओव्हरलोड वीज विद्युत रोहित्रामुळे पूर्ण क्षमतेने वीज पुरवठा होत नव्हता. आ. सुरेश धस यांच्याकडे ग्रामस्थांनी मागणी करताच पाठपुरावा करून गावठाण अंतर्गत ११ विद्युत रोहित्रांना मंजुरी मिळाली असून विद्युत रोहित्र उपलब्ध करून दिले.

# प्राचार्य सय्यद व उपप्राचार्य कर्डीले यांनी अत्यंत निष्ठेने, प्रामाणिकपणाने शैक्षणिक कार्य केले - आ.सुरेश धस

## सेवापूर्ती सोहळ्यास अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील धानोरा येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य वाय. यु. सय्यद आणि उपप्राचार्य बाबासाहेब कर्डीले यांची नियत वयोमानानुसार सेवापूर्ती आज होत आहे. सय्यद सर व कर्डीले सर हे दोघेही माझे जवळचे मित्र आहेत. या दोघांनीही शैक्षणिक गुणवत्ता व आदर्श विद्यार्थी घडविले आहेत. त्यांनी अत्यंत निष्ठेने, प्रामाणिकपणाने शैक्षणिक कार्य केले असल्याचे प्रतिपादन आ. सुरेश धस यांनी केले.

आष्टी तालुक्यातील धानोरा येथील बाबासाहेब कर्डीले आणि वाय. यु. सय्यद यांच्या सेवापुर्ती सत्कार सोहळ्यात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सभापती तथा जनता वस्तीगृह संस्थेचे सचिव विजयकुमार बांदल हे होते. प्रमुख पाहुणे संस्थाध्यक्ष अब्दुलभाई सय्यद, ह. भ. प. आदिनाथ आंधळे, माजी आ. सुधीर तांबे, माजी आ. साहेबराव दरेकर, रमेशभाऊ पोकळे, कांतीलाल चानोदिया, राजाभाऊ दरेकर, उपसंपादक उत्तम बोडखे, संजय वारे, परमेश्वर शेळके, उध्दव बापु दरेकर, राजेंद्र गव्हाणे, ड. रमेश जंजीरे, राजेंद्र दहातोंडे, मनोज धस, दत्ता चव्हाण, संजय काळे, पांडुरंग चव्हाण, आण्णा चव्हाण, राजाभाऊ शेळके, शोक चव्हाण, जगन्नाथ ढोबळे, भगवान काळे, प्राचार्य उत्तम गव्हाणे, सय्यद युनूस, बन्सीभाऊ पोकळे, डा. राज शेख, कुमार शेळके, नामदेव शेळके, अंकुश चव्हाण, परमेश्वर गायकवाड, चेअरमन बाळासाहेब शिंदे, शिरीष भाऊ थोरवे, पोपट घुले, गोरख कर्डीले, नागेश कर्डीले, बाळासाहेब शेंदुरकर, अशोक लगड, प्रा. डा. मुस्ताक पानसरे, महादेव अडागळे, चंद्रकात वामन, बापु शेळके, बिभिषण दिघे, श्रीनिवास पोकळे, सय्यद मुसा आदि मान्यवर उपस्थित




होते.आ. सुरेश धस पुढे बोलतांना म्हणाले की, माझ्या चांगल्या व वाईट दिवसात हे दोनही मित्र सहभागी असतात. कंत्राटी पध्दतीने यांना संधी देण्यात यावी. फार कमी लोक सलग ३० वर्षे एकाच क्षेत्रात कार्यरत असतात. त्यापैकी सय्यद व कर्डीले आहेत. पवार, मोहिते, विखे, मुंडे, ठाकरे, राणे, थोरात यांचे राजकारण ३० वर्षापासुन घरात आहे. सतत कार्यात मग्न असणारा राजकरणात टिकतो. सर तुम्ही रिटायर्ट झालात परंतु टायर्ड झालेले नाहीत. आता मलाही दोन्ही हक्काचे कार्यकर्ते मिळालेत असेही आ. सुरेश धस म्हणाले. यावेळी माजी आ. साहेबराव दरेकर म्हणाले की, कर्डीले सर व सय्यद सर आज सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत. शासकीय सेवा म्हटले की, सेवानिवृत्ती ही आलीच. शैक्षणिक कामाऐवजी आता सामाजिक काम करण्याची त्यांना संधी प्राप्त झाली आहे. या दोघांचे वय सेवानिवृत्ती इतके झाले असले तरी त्यांच्याकडे पाहिल्यास त्यांचे वय इतके असावे असे वाटत नाही. सय्यद व कर्डीले कुटुंबीयांचा आमचा संबंध गेली ४० वर्षापासूनचा आहे. कर्डीले कुटुंबियांचे अत्यंत चांगले संस्कार त्यांच्या मुलांमध्ये आलेले असल्यामुळे बाबासाहेब कर्डीले सर यांनी देखील त्यांच्याच पावलावर पार ठेवून अत्यंत निष्ठेने, प्रामाणिकपणाने आणि शैक्षणिक सेवा केलेली आहे. ही सेवा देत असताना कर्डीले यांनी कोणालाही दुखावलेले नाही आणि कोणासमोर झुकले देखील नाहीत. सतत चांगले विचार डोक्यात ठेवल्यामुळे ते आपल्या कर्तव्यामध्ये यशस्वी झालेले आहेत. त्यांनी यापुढे आता स्वतंत्र भारताचे स्वतंत्र नागरिक या नात्याने मुक्तपणे सामाजिक कार्यामध्ये सहभाग नोंदवावा कारण त्यांच्यासारख्या सुशील संस्कारात वाढलेल्या व्यक्तींनी समाजासाठी काही वेळ काढावा, कारण त्यांच्यासारख्या संस्काराची आज समाजाला निश्चितपणे आवश्यकता आहे. त्यामुळे कर्डीले यांचे पुढील आयुष्य अत्यंत आरोग्यदायी, आनंददायक वातावरणात जावे अशा शुभेच्छा दिल्या. यावेळी दिगंबर चव्हाण, संदीप राळेभात, नारायण राळेभात, राहुल राळेभात, सतीश राळेभात, विनोद राळेभात, दिनेश राळेभात, आबा साळुंखे, डॉ. सुपेकर, विनायक राऊत, अवधूत पवार, काकासाहेब कर्डिले, माजी सरपंच दत्ता चव्हाण, संपत कर्डिले, सरपंच माऊली वाघ, उपसरपंच परमेश्वर कर्डिले, शहाराम कर्डिले आदि उपस्थित होते. यावेळी माजी आ. डा. सुधीर तांबे, मनोज धस, धर्माचार्य ह. भ. प. आदिनाथ आंधळे महाराज यांचे भाषणे झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन पठाण सर व प्रा. ए. एम. पवार यांनी केले तर शंकर गाडे सर यांनी आभार मानले.

# तंत्रशिक्षण मंडळाच्या उन्हाळी परीक्षेत टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकचे यश

## निकालात मुलींची बाजी ; गणितात मिळविले शंभर गुण

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था संचलीत टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकच्या, विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने घेतलेल्या उन्हाळी परीक्षा-२०२५ मध्ये उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवत दैदीप्यमान यश संपादन केले. त्यामध्ये गणित विषयात अंकिता हाके, योगेश्वरी जाधव आणि शुभ्रा हालगे या विद्यार्थीनींनी १०० पैकी १०० गुण घेऊन स्पृहणीय यश संपादन केले आहे. कॉम्प्युटर इंजिनीअरींग शाखेचा निकाल ९८ टक्के, इलेक्ट्रिकल इंजिनीअरींग शाखेचा निकाल ९५ टक्के, मेकॅनिकल इंजिनिअरींग शाखेचा निकाल ९० टक्के, सिव्हिल इंजिनिअरींग शाखेचा निकाल ८० टक्के, ईलेक्ट्रॉनिक्स कॉम्प्युटर इंजि.शाखेचा निकाल ९५ टक्के लागला आहे.




प्रथम वर्ष कॉम्प्युटर इंजिनीअरींग शाखेतून अंकिता हाके (९४.१२ टक्के), योगेश्वरी गाढवे (९३.१८ टक्के), शुभ्रा हालगे (९२ टक्के), द्वितीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनीअरींग शाखेतून समाधान छत्रे (९०.२४ टक्के), क्षितीजा आगळे (८९.७७ टक्के), वैभवी रांदड (८७.०६ टक्के), तृतिय वर्ष कॉम्प्युटर इंजिनीअरींग शाखेतून अभिषेक सुरवसे (९३.५४ टक्के), स्नेहल पवार (९१.७७ टक्के), बालाजी गायकवाड (९१.०६ टक्के), प्रथम वर्ष ईलेक्ट्रॉनिक्स कॉम्प्युटर इंजिनिअरींग शाखेतून गायत्री मुंडे (८५.६३ टक्के), अंजली धायतिडक (८२.२५ टक्के), अस्मिता गित्ते (७८.१३ टक्के), प्रथम वर्ष स्थापत्य इंजिनिअरींग शाखेतून आदित्य दराडे (७७.४४ टक्के), सुमित चटप (७३.८९ टक्के), आशिष पवार (६९.४४ टक्के), प्रथम वर्ष इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग शाखेतून आदित्य औताडे (७६ टक्के), विशाल शितोळे (७५ टक्के), गौरी फुण्णे (७१.२९ टक्के), अभिषेक मुसळे (७१.२९ टक्के), द्वितीय वर्ष इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग शाखेतून योगिता निळे (८०.८२ टक्के), पांडूरंग पवार (७५.७७ टक्के), वैष्णवी नागरगोजे (७२.९४ टक्के), तृतिय वर्ष इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग शाखेतून मुक्ता बिडगर (८९.८९ टक्के), ओम भगत (८९.७८ टक्के), आकांक्षा मुंगळे (८९.२८ टक्के), प्रथम वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरींग शाखेतून ओंकार रेणवकर (७८.५६ टक्के), रितेश घोरपडे (७५ टक्के), अभय खरटमोल (७४.२२ टक्के), द्वितीय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरींग शाखेतून ज्ञानेश्वरी सिरसाठ (८१.७८ टक्के), आदित्य चव्हाण (७७.७८ टक्के), सिद्धार्थ गवळी (७३.३३ टक्के), तृतिय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरींग शाखेतून मेघराज साठे (८३.३३ टक्के), संकेत डोंगरे (७६.४४ टक्के), वेदांत तट (७५ टक्के) या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अदीनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनिल मिटकरी, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी. कार्यवाहक प्राचार्य डॉ.एन.ए.रावबावले, तंत्रनिकेतनचे प्राचार्य लक्ष्मीकांत बगले, विभागप्रमुख व्हि.व्हि.कन्नुर, श्रीमती अंजली कुलकर्णी, कु.रेणुका डबीर, प्रा.व्हि.व्हि.रावबावले, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.

# दुकान जळाल्याने आर्थिक विवंचनेत सापडलेल्या मित्राला सुरू करून दिला नवा व्यवसाय

## रोटरी क्लबचा अनोखा उपक्रम

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

आगीत रेडीमेड कपड्यांचे दुकान जळून खाक झाले.यात गणेश राऊत यांचे २५ लाखांचे नुकसान झाले. हताश झालेल्या राऊत यांना रोटरी क्लबच्या सर्व मित्रांनी एकत्रित येत भरघोस मदत केली. या मदतीतून आज त्यांच्या नवीन हॉटेल व्यवसायाची सुरुवात झाली. मित्रांच्या या मदतीच्या झऱ्याने उध्वस्त झालेल्या कुटुंबाला जगण्याचे नवे बळ मिळाले. येथील अत्यंत सामान्य कुटुंबातील गणेश राऊत यांनी १० वर्षापूर्वी अल्प भांडवलावर रेडीमेड कपड्यांचे दुकान सुरू केले. हळू हळूहळू त्यांनी या व्यवसायात मोठी प्रगती केली. ते स्वतःच्या कष्टातून उभ्या केलेल्या साम्राज्यावर उभे असतानाच नियतीने डाव साधला. अचानक लागलेल्या आगीत त्यांचे रेडीमेड कपड्यांचे दुकान जळून खाक झाले. यात त्यांचे २५ लाखांपेक्षाही ज्यात नुकसान झाले. तांत्रिक अडचणी मुळे त्यांना कसलाही विमा,अथवा मदत मिळाली नाही. अचानक कोसळलेल्या संकटामुळे राऊत कुटुंबीय मोठ्या आर्थिक विवंचनेत सापडले. गणेश राऊत हे रोटरी क्लब चे माजी सचिव होते. त्यांच्या या दुःखात रोटरी परिवार



सहभागी झाला. मात्र केवळ दुःख न करीत बसता या आर्थिक विवंचनेतून त्यांना सावरण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. असा निर्धार रोटरी क्लबचे अध्यक्ष कल्याण काळे व सचिव धनराज सोळंकी यांनी केला. रोटरी क्लब मधील ८६ सदस्यांची बैठक घेतली. व पुन्हा राऊत यांना नव्याने व्यवसायात उभा करण्याचा संकल्प केला. सर्व सदस्यांनी जशी जमेल तशी आर्थिक मदत राऊत यांना केली. दुर्घटने नंतर चारच महिन्यात गणेश राऊत यांना नवीन हॉटेल व्यवसाय उभा करून दिला. शनिवारी सकाळी या नवीन व्यवसायाची शानदार सुरुवात जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा,राऊत यांच्या मातोश्री कस्तुरबाई राऊत,

रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे,सचिव धनराज सोळंकी व सर्व रोटरी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाली. आर्थिक संकटात सापडलेल्या आपल्या मित्राला पुन्हा नवी उभारी देण्यासाठी त्यांच्या पंखात आर्थिक बळ निर्माण केले. व विवंचनेत सापडलेल्या कुटुंबाला धीर दिला. रोटरीच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष व प्रवक्ते महेश शिंदे यांचा बीड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात झंझावाती दौरा

## अंबाजोगाईत माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या कार्यालयास सदिच्छा भेट

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित दादा गट) चे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष व प्रवक्ते, तसेच माणुसकी सेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष महेश भाऊ शिंदे यांनी बीड, लातूर व धाराशिव जिल्ह्यांमध्ये झंजावती दौरा केला. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या आदेशानुसार हा दौरा आयोजित करण्यात आला होता. या दौर्याचा उद्देश मराठवाड्यातील शेतकरी, महिला, युवक, मजूर आणि वंचित घटकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर सामाजिक व शासकीय स्तरावर उपाययोजना करणे आणि पक्ष संघटन बळकट करणे असा होता. या दौऱ्यात त्यांनी माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या सहकार कार्यालयात भेट देऊन शहरातील नागरी समस्या व पक्ष संघटन या विषयावर चर्चा केली.

अंबाजोगाई येथील शासकीय विश्रामगृहात छत्रपती शाहू महाराज यांची जयंती महेश शिंदे यांच्या हस्ते साजरी करण्यात आली. यानंतर उपस्थित कार्यकर्त्यांशी चर्चा करताना शिंदे यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा आदर्श घेत, सामाजिक न्यायाची दिशा



अधिक दृढपणे मांडली. यानंतर कार्यकर्त्यांशी संवाद साधत त्यांनी सांगितले की, 'माणुसकी सेवा ही आमची नांदी आहे. या नांदीतूनच परिवर्तन घडविणार आहोत.' माणुसकी सेवा फाऊंडेशनच्या कार्यपद्धती, उद्दिष्टे आणि भविष्यातील योजना यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या दौऱ्यात त्यांनी माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या सहकार कार्यालयात भेट देऊन शहरातील नागरी समस्या व पक्ष संघटन या विषयावर चर्चा केली. आणि ममदापूर (पाटोदा) येथे शेतकऱ्यांच्या व्यथा समजून घेतल्या हे विशेष होय. पुढे पाटोदा (ममदापूर) येथील खांडसरी कारखान्याला भेट देऊन परिसरातील शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बाळासाहेब देशमुख, सरपंच अविनाश उगले, व्यंकटराव बावणे, ग्रामपंचायत सदस्य गुलाबराव मुळे, श्रीकांत देशमुख यांच्यासह ममदापूर, धानोरा, पाटोदा, देवळा व परिसरातील शेकडो शेतकरी उपस्थित होते. त्याचबरोबर देवळा (अंबाजोगाई) येथे सामाजिक संवेदनशीलतेचा ठसा उमटविला. या दौऱ्यात अंबाजोगाई तालुक्यातील देवळा गावालाही महेशभाऊ शिंदे यांनी भेट दिली. गावातील प्रतिष्ठित नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांच्या घरी जाऊन संवाद साधला. जमलेल्या ग्रामस्थांशी विविध सामाजिक प्रश्नांवर चर्चा करताना त्यांनी विशेषतः गावातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्याचे ठोस आश्वासन दिले. 'सामान्य माणसाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आणि त्यांच्या समस्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते अजितदादांच्या माध्यमातून, तसेच माणुसकी सेवा फाऊंडेशनच्या माध्यमातून प्रभावीपणे सोडवण्याचे काम मी करत राहीन,' असे ठाम शब्दांत त्यांनी सांगितले. त्यांनी हेही स्पष्ट केले की, 'मराठवाड्यातील जनतेशी सतत थेट संपर्कात राहणे हेच माझे कर्तव्य आणि ध्येय आहे.' यावेळी श्रीकृष्ण पवार, सुधाकर पवार, तात्या सस्ते, सतीश पवार, मोहन पवार, शरद पवार, आण्णासाहेब पवार हे उपस्थित होते. तसेच लातूर जिल्ह्यातील मुरूड येथे महिलांशी संवाद साधला. मुरूड (लातूर) येथे बचत गटाच्या महिलांसोबत विशेष चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले. महिला सक्षमीकरण, ग्रामीण उद्योग निर्मिती, शासकीय योजना याबाबत माणुसकी सेवा फाऊंडेशनची भूमिका स्पष्ट करताना महेश शिंदे यांनी सांगितले की, 'कौटुंबिक आणि सामाजिक प्रगतीसाठी महिलांचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक आहे. ग्रामीण भागातील महिला आजही पूर्णपणे सक्षम झालेल्या नाहीत, त्यामुळे महिला सक्षमीकरणावर भर देणे काळाची गरज आहे.' या कार्यक्रमाला रेश्मा शेख, रवी उबाळे तसेच अनेक बचत गटांच्या महिला प्रमुख उपस्थित होत्या. या दौऱ्यात त्यांनी धाराशिव जिल्ह्यातील तेर येथे 'माणुसकी संवाद' दौऱ्याच्या पुढील टप्प्यात धाराशिव जिल्ह्यातील प्रसिद्ध ऐतिहासिक तेर या गावाला भेट देत, महेशभाऊ शिंदे यांनी नागरिकांच्या समस्या ऐकून घेतल्या. ते म्हणाले, 'या समस्या फक्त ऐकून घेण्यासाठी नाहीत, तर वैयक्तिक लक्ष देऊन त्या सोडविण्यासाठी मी स्वतः पुढे येणार आहे. समाजातील सर्वांना सोबत घेऊन 'माणुसकी सेवा फाऊंडेशन' मराठवाड्यात गावोगावी, वाड्यावस्त्यांवर कार्यरत होईल.' या कार्यक्रमात प्रवीण सोळंके, पत्रकार बंधू व त्यांच्या टीमने आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला, युवक आणि विविध वृत्तपत्रांचे पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. महेश शिंदे यांच्या या दौऱ्यामुळे मराठवाड्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि माणुसकी सेवा फाऊंडेशनच्या कार्याला नवसंजीवनी मिळाली आहे. ग्रामीण वस्तीपर्यंत पोहोचून पक्ष बळकटीकरणाची दिशा ठरविणाऱ्या या दौऱ्याचे सर्वत्र स्वागत होत आहे.



# पाटोदा नगरीत राष्ट्रसंत ऐश्वर्यसंपन्न संत भगवान बाबा यांच्या पालखी सोहळ्याचे दिव्य आणि भव्य स्वागत!

पाटोदा (प्रतिनिधी)

राष्ट्रसंत, ऐश्वर्यसंपन्न संत भगवान बाबा यांच्या पालखीचे पाटोदा शहरात आगमन होताच संपूर्ण शहर भक्तिरसात न्हालं. ढोल-ताशाचा गजर, टाळ-मृदुंगांचा निनाद, आणि भक्तांच्या गजरांनी आसमंत दुमदुमून गेला. सर्वत्र श्रद्धा, आनंद आणि अध्यात्मिक उर्जा भरली होती. भक्तीचा महोत्सव!पाटोदा शहरात सकाळ पासूनच उत्सवाचे वातावरण होते. सकाळी १०.३० वाजता पालखीने पाटोदा शहरात प्रवेश केला. हजारो भाविक रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून 'जय संत भगवान बाबा' च्या घोषणांनी स्वागत करत होते. शहरातील गल्लीबोळ भगव्या पताकांनी, पुष्पसजावट आणि आकर्षक रांगोळ्यांनी सजले होते. महिलांनी औक्षण केले पारंपरिक पोशाखात भक्ती भावाने स्वागत केले. तर युवकांनी ढोल-ताशांच्या लयीत नृत्य करत भक्तीचा उत्सव साजरा केला.आस्थेने साकारलेले नियोजन, सेवाभावी हातांची साथ सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी पाटोदा नगरपंचायत, पोलीस प्रशासन, वैद्यकीय सेवा, स्वयंसेवक आणि सामाजिक संस्थांनी एकत्रितपणे अतुलनीय कार्य केले. वाहतूक, स्वच्छता, पाणीपुरवठा, अन्नछत्र, महाप्रसाद आदी सर्व व्यवस्था उत्तम प्रकारे पार पाडण्यात आल्या. कोणतीही अडचण न येऊ देता संपूर्ण सोहळा अत्यंत शिस्तबद्धपणे पार पडला.पाटोदा नगरीचा सुवर्णक्षण संपूर्ण शहरासाठी एक आध्यात्मिक महोत्सव होता.

# अखंड चौदा वर्षापासून पंढरीची पायी वारी करणारा दिव्यांग वारकरी प्रदीप मुजमुले

वडवणी (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील पुसरा गावचे दोन हि पायाने दिव्यांग असणारे प्रदीप भानुदास मुजमुले वय तीस वर्षे हे गेल्या १४ वर्षापासून आळंदी ते पंढरपूर पायी वारी करतात दोन्ही पायाने अपंग परंतु जिद्द व धैर्य या बळावर ते आजही आळंदी ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्यामध्ये सहभागी आहेत . वडवणी तालुक्यातील पुसरा येथील जन्मताच दोन्हीही पायाने दिव्यांग असणारे प्रवारकरीमुजमुलेजमुले यांची घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असुन वयोवृद्ध वडिल आजारपणामुळे अंथरुणात पडून असून आई वयोवृद्ध,मोठे दोन्हीही बंधू सुशिक्षित बेकार असुन आणि स्वतः अपंग परंतु विठ्ठलाची भक्ती व मनामध्ये दुसऱ्यांच्या भल्यासाठी असणारा मोठेपणा या बळावर वारकरी संप्रदायात व दिंडी सोहळ्यामध्ये स्वतःच योगदान हे प्रदीप भानुदास मुजमुले देत असतात. चांगला



माणूस एक ते दोन किलोमीटर चालायचं म्हटलं तर थकतो व चालू शकत नाही परंतु दोन्ही पायांनी अपंग असलेले प्रदीप मुजमुले हे मात्र प्रत्येक वर्षी आळंदी ते पंढरपूर दिंडी सोहळ्यामध्ये न चुकता व न थकता पायी वारी करतात त्यांच्या या वारीमुळे महाराष्ट्रामध्ये सुपरिचित व प्रसिद्ध आहेत. अनेक टीव्ही चॅनेल वाल्यांनी त्यांची मुलाखत घेतलेली आहे त्यांना अनेक ठिकाणी बोलावून त्यांचा सन्मान केला जातो व आर्थिक व साहित्याची मदत हि करतात सन २०२३ मध्ये आयपीएस अधिकारी विश्वासराव नांगरे पाटील यांनी सुद्धा प्रदीप मुजमुले यांचा पायी चालतांनाचा व्हिडिओ शेअर केला होता.अपंग प्रदीप मुजमुले यांच्यासह महाराष्ट्रातील अपंग बांधवांची राज्य सरकारने दखल घेण्याची गरज आहे. अपंग प्रदीप मुजमुले यांचा १४ वर्षाचा हा सोहळ्यातील पायी चालल्याने इतर दिंडी सोहळ्यातील वारकऱ्यांना हि चालण्याची व विठ्ठल भक्तीची ऊर्जा मिळते याचं हे प्रदीप मुजमुले उदाहरण आहेत. तरी दिव्यांग वारकरी मुजमुले याचे अखंड महाराष्ट्रातून कौतुक केले जाते. मी पांडुरंगाचा निस्सीम भक्त असून गेल्या १४ वर्षापासून न चुकता न थकता पांडुरंगाची आळंदी ते पंढरपूरची पायी वारी करतो यामध्ये मला समाधान व आनंद मिळतो व जगण्याची ऊर्जा मिळते तरी मी जीवात जीव असेपर्यंत आळंदी ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्यात सहभागी होणार व खंड पडून देणार नाही.

# आ. सुरेश धस यांची गहिनीनाथगड अश्वलींग संस्थानच्या दिंडीला भेट

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा तालुक्यातील श्री क्षेत्र गहिनीनाथ गड व श्री क्षेत्र अश्वलींग संस्थान पिंपळवंडी येथुन आषाढी वारीसाठी निघालेल्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी दिंडीला. मतदारसंघातील आ. सुरेश धस यांनी भेट देऊन वारकऱ्यांशी संवाद साधला व महंत यांचे किर्तन श्रवण केले यावेळी मोठ्या संख्येने वारकरी मंडळीं उपस्थित होती.श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड ते पंढरपूर पायी दिंडीचा पहिला मुक्काम असणाऱ्या निवडुंगा येथे आ. सुरेश धस यांची गहिनीनाथगड गडाचे महंत श्री. विठ्ठल महाराज यांचे कीर्तन श्रवण केले तसेच श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान पिंपळवंडी येथे आषाढी एकादशीनिमित्त पिंपळवंडी ते पंढरपूर दिंडी सोहळ्याच्या प्रस्तावना प्रसंगी आ. सुरेश धस हे उपस्थित राहिले व महंत ह.भ.प. मधुकर महाराज शास्त्री यांचे दर्शन घेत आशीर्वाद घेतले. तसेच भाविक भक्त, वारकरी मंडळी, ग्रामस्थ यांच्याशी संवाद साधला सध्या राज्यभरातून विठ्ठल भक्त विठ्ठलाचे पंढरपुरात दाखल होत आहेत. ठिकठिकाणाहून विठ्ठल नामाचा गजर करत निघालेल्या संतांच्या पालख्या, दिंड्यामुळे अवघ्या महाराष्ट्रात भक्तिमय वातावरण निर्माण झालं आहे. या दिंडी सोहळ्यामध्ये जात धर्म पंथाचा कोणताही भेदभाव केला



जात नाही. केवळ 'माऊली' या शब्दांमध्ये गुंतलेला हा ज्ञानोबा, तुकाराम, भानुदास, एकनाथ, रामकृष्ण हरी हा नामघोष व भजन करत भाविक या सोहळ्यात सहभागी होतात. तसेच शेकडो किलोमीटर पायी प्रवास करून राज्याच्या कानाकोपऱ्यासह, कर्नाटक आंध्र प्रदेश आणि काही प्रमाणात देशाबाहेरून वारकरी या सोहळ्याचा आनंद घेण्यासाठी पालखीमध्ये सहभागी होतात. सर्वांना वारीचे अनन्यसाधारण महत्त्व असल्यामुळेच ग्रामीण भागासह शहरी भागातील नागरिक मोठ्या उत्साहाने पालखी सोहळ्याचे स्वागत

आ. सुरेश धस यांनी भेट दिली. यावेळी वारकऱ्यांशी आपुलकीचा संवाद साधला.शिवाय त्यांना येणाऱ्या अडचणी देखील जाणून घेतल्या. तसेच आ. सुरेश धस म्हणाले यावेळी. माउली जरांगे. भाऊसाहेब भवर, उद्धव पवार, रामकिसन भोंडवे आप्पा, दादा धनवडे, सरपंच निलेश मोरे, गोविंद गाडे, महेश खेंगरे, अशोक जेधे, सतिष पवार, दादा पवार, साबळे सर, अशोक पवार, अमोल पोकळे, यांच्यासह. चिंचोली चिखली. निवडंगा. अंमळनेर, पिंपळवंडी डोंगरकिन्ही, जाटनांदूर, भडकेल, माळेवाडी गांधनवाडी, पांढरवाडी व पंचक्रोशीतील भाविक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आनंद व आरोग्यदायी जीवन जगण्यासाठी नशा व व्यसनाधीनते पासून दूर रहावे – डॉ. वसुदेवबप्पा गायकवाड

केज/ प्रतिनिधी

**आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण,आनंदगांव ता. केज.जि.बीडच्या केज येथील संपर्क कार्यालयात आयोजित नशा व व्यसनाधीनता शरीराला व आरोग्याला घातक या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून संस्थेचे संस्थापक कार्यवाह,जेष्ठविचारवंत, जेष्ठ समाजसेवक डॉ. वसुदेवबप्पा गायकवाड बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की,आरोग्यदायी व आनंददायी जीवन जगण्यासाठी शारीरीक, मानसीक,सामाजिक, आर्थिक हानी व नामुष्की टाळण्यासाठी व्यसनापासून व नशा मुक्त आयुष्य प्रत्येकाने जगावे असे आवाहन डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.यावेळी संजय सोनवणे, आनंदभैय्या गायकवाड,**
एस.एस.शिनगारे,पी.एस.शिनगारे, आशालता येळवे यांनी ही मार्गदर्शन केले.दि. २१ जुन २०२५ रोजी जागतीक योगदिन साजरा करून योग करण्याचे फायदे सांगीतले.दि.५ जुन २०२५ रोजी जागतिक पर्यावरणदिनकार्यशाळा घेवून साजरा



करण्यात आला.पर्यावरणाचे महत्व,पर्यावरणसंवर्धनाची आवश्यकता,मानवी जीवनासाठी व सर्वच जिवजंतूच्या अस्तित्वा साठी पर्यावरण जपणे कसे आवशयक आहे हे सांगून अन्नसाखळी जपण्यासाठी व भविष्यातजीवनावश्यक अशा प्राणवायूची पर्यायाने ऑक्सीजनची अडचण येवू नये म्हणून पर्यावरणाचे जतन व संवर्धन करावे असे आवाहनही आनंदभैय्या गायकवाड यांनी केले.

# मुख्याध्यापिका श्रीम.पठाण सालेहा यांनी आदर्श विद्यार्थी घडविले – सिमाताई काळे

## आष्टी,पाटोदा तालुक्यातील गुणवत्ता जिल्ह्यात सर्वोउत्कृष्ट – मनोरंजन धस

आष्टी (प्रतिनिधी)

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिमनगर येथील कार्यतत्पर मुख्याध्यापिका श्रीमती पठाण सालेहा रहिमखाँ या शिक्षण क्षेत्रात सेवा करत असतांना वयाची ५८ वर्षे पूर्ण केल्यामुळे त्यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ मोरेश्वर लॉन्स आष्टी येथे दि. २७ जून २०२५ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी अध्यक्षस्थान आष्टी पंचायत समितीच्या कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी श्रीम. सिमाताई काळे यांनी भूषविले. तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तारअधिकारी मनोरंजन धस, नगराध्यक्ष जियाभाई बेग, शेख युसुफ, चंद्रकांत उकांडे, शेख मुस्ताफा सर, वाहेद पठाण, सय्यद शफी भाई, शिवलींग लगड, दादासाहेब खाडे, बन्सीधर मोरे बापू, चंद्रकांत शिंदे, संपत धोंडे, शेख नईम सर, प्रकाश सातपुते, केंद्रप्रमुख त्रिंबक दिंडे, मुख्याध्यापक सुरेश पवार, पतसंस्थेचे अध्यक्ष मारुती पठाडे, उपाध्यक्ष अशोक लटपटे, सचिव महेश शिंदे, संचालक आप्पासाहेब काळे, चंद्रशेखर खाडे, प्रविण मेहेरकर, संजय काळे, विनोद निकाळजे, शेख



रैहान, कु. तस्मीया शेख आदी उपस्थित होते.

यावेळी गटशिक्षणाधिकारी सिमाताई काळे मॅंडम यांनी बोलतांना सांगितले की, श्रीम. पठाण यांनी अनेक विद्यार्थी घडवून त्यांना संस्कारक्षम बनविले. त्यांचे शैक्षणिक कार्य अंत्यत चांगले होते त्यामुळेच त्यांची मुले उच्च विभूषित आहेत. मुख्याध्यापिका म्हणून त्यांनी प्रशासकीय कामकाज चांगल्या प्रकारे केलेले आहे असे सांगून त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच यावेळी मनोरंजन धस साहेबांनी म्हटले की, बीड जिल्ह्यात आष्टी व पाटोदा तालुक्याची गुणवत्ता सर्वोउत्कृष्ट असून याचे सर्व श्रेय दोनही तालुक्यातील शिक्षकांचे आहे. आता शिक्षकांपुढे अनेक आव्हाने आहेत ती पेलवण्याची तयारी शिक्षकांनी ठेवावी. तसेच शाळेची पटसंख्या वाढविण्यासाठी जास्तीचे प्रयत्न करावेत जेणेकरुन भविष्यात शिक्षक अतिरिक्त होणार नाहीत. तसेच श्रीम. पठाण मॅंडम यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी असून त्यांचा आदर्श सर्वांनी घ्यावा. श्रीम. पठाण मॅंडम यांना त्यांनी भावी वाटचालीस व भावी आयुष्य आरोग्यदायी जावो यासाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी अमरनाथ ढोबळे, अर्जुन पवार, शेख युसुफ, चंद्रकांत उकांडे, त्रिंबक दिंडे, सुरेश पवार, मारुती पठाडे, अशोक लटपटे, श्रीम. कुंदाताई धोंडे, तस्मीया शेख आदींनी मनोगत व्यक्त केले तर प्रास्तविक तायराम गळगटे यांनी केले. यावेळी प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष संदिप खराडे, बाळासाहेब शेंदूरकर, शशिकांत खाडे, बाळासाहेब बन्सोडे, पोपटराव काळे, मिलींद नेटके, बिभिषण कवडे, विलास मोरे, विधिज्ञ महादेव तांदळे, डी. एस. ससाणे, शेख रियाज भाई, विजय ढोबळे, आदिनाथ पोकळे, हनुमंत शिंदे आदी उपस्थित होते. तसेच आष्टी नं.१ केंद्रातील सर्व मुख्याध्यापक व सहशिक्षक, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव शाळा व्यवस्थापन समिती प्रा. शा. भिमनगर, पीएम श्री कन्या प्रशाला आष्टी व माध्यमिक शाळा मुलांची आष्टी येथील सर्व शिक्षक - शिक्षिका वृंद, नातेवाईक, ग्रामस्थ या सेवापूर्ती सोहळ्यासाठी उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन आदर्श शिक्षक बाळासाहेब तळेकर यांनी तर उपस्थितांचे आभार राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक राजेंद्र लाड यांनी मानले.

# मुरबाड मध्ये अदिती पेट्रोल पंप मध्ये भेसळ ?

मुरबाड ।प्रतिनिधी

मुरबाड मधील अदिती पेट्रोल पंप मध्ये भेसळ असल्याच्या तक्रारी वरून पुरवठा विभागाने सील केलेला पेट्रोल पंप कारवाई ला नं जुमानता बेकायदेशीरपणे सुरु केल्याचा प्रकार शुक्रवारी मुरबाड अदिती पेट्रोल पंप येथे घडला.या घटनेवरून बेकायदा धंदे करणारे,तहसीलदार यांनी केलेल्या कारवाई ला न जुमानत पेट्रोल पंप चालु झाल्याचे स्पष्ट झाले आहे.दरम्यान बेकायदा सुरु करण्यात आलेला पेट्रोल पंप पुरवठा विभागाने पुन्हा सील केला.

मागील शुक्रवारी येथील इंडियन ऑइलच्या अदिती पेट्रोल पंपावर भेसळयुक्त पेट्रोल मिळत असल्याची तक्रार आल्याने तहसीलदार अभिजित देशमुख यांच्या आदेशानुसार पुरवठा विभागाने सदर पूर्ण पेट्रोल पंप सील केला.व पेट्रोलचे नमुने फॉरेन्सिक लॅबला पाठविण्याची कारवाई केली.या लॅब कडून योग्य अहवाल आल्यानंतर पंप चालू किंवा बंद ठेवण्याबाबत निर्णय होईल. मात्र असे असताना व कोणतेही आदेश नसताना पेट्रोल पंप गुरुवारी रात्रीच सुरु झाल्याचे दिसून आले.याबाबतची माहिती पुरवठा विभागाला मिळताच पुन्हा हा पंप सील करण्यात आला. त्यामुळे शासनाने सील केलेला पंप बेकायदेशीरपणे सुरु करण्याचे धाडस करू शकतो, हे या पेट्रोल पंप चालकाने दाखवून देऊन शासनालाही भीत नाही हा संदेशच जणू दिला आहे.तहसीलदारांच्या आदेशालाही नं जुमानणाऱ्या या पेट्रोल पंप चालक, मालक यांच्या धाडसाचे मात्र मुरबाडमध्ये कौतुक होत आहे.सील केलेला पंप बेकायदेशीरपणे सुरु करणाऱ्यांवर तहसीलदार आता काय कारवाई करतात याकडे लक्ष लागले आहे.

# तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केली ऐतिहासिक कारंजा टॉवरची पाहणी

एस.एम.युसूफ़ यांनी परिपूर्ण नूतनीकरणासाठी आवश्यक मुद्दे मांडले

बीड ।प्रतिनिधी

वाचन व लेखन प्रिय तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी शहरातील ऐतिहासिक कारंजा टॉवरला शनिवार दिनांक २८ जून २०२५ रोजी भेट देऊन पाहणी केली. गेल्या दहा वर्षांपासून कारंजा टॉवर च्या परिपूर्ण नूतनीकरणाविषयी सातत्याने निवेदन आणि वृत्तपत्रातून लक्ष वेधणारे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी परिपूर्ण नूतनीकरण व्हावे यासाठी आवश्यक असलेले सर्व मुद्दे तहसीलदार शेळके यांच्यासमोर मांडले. यावेळी तलाठी शब्बीर पठाण, शेख लईख, जहीर शेख, सय्यद सरफराज यांच्यासह इतरांची उपस्थिती होती. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे हे काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहू शकले नाही.

यावेळी तहसीलदार शेळके यांना ऐतिहासिक कारंजा टॉवर विषयी माहिती देताना एस.एम.युसूफ़ म्हणाले की, कारंजा टॉवर हे १८३८ साली बांधण्यात आलेले आहे. त्याला आता १८७ वर्षे झाली आहेत. अजून १३ वर्ष उलटल्यानंतर ऐतिहासिक कारंजा टॉवरचे द्विशतक पूर्ण होईल. अशा या ऐतिहासिक वास्तूचे जतन, देखभाल, डागडूजी आणि आवश्यक त्या कार्यासाठी जिल्हा प्रशासनासह बीड नगर परिषद प्रशासन उदासीन आहे.



कारंजा टॉवरच्या दूर्दशेविषयी वारंवार निवेदने तसेच प्रसिद्धी माध्यमातून बातम्या देण्यात आलेल्या आहेत. तरीही ऐतिहासिक कारंजा टॉवरचे परिपूर्ण नूतनीकरण केले जात नाहीये. एकीकडे प्रशासनाची अशी अवस्था असताना दुसरीकडे लोकप्रतिनिधी म्हणून बीडचे आमदारही या प्रश्नाकडे लक्ष द्यायला तयार नाही म्हणून आता बीड चे तहसीलदार म्हणून आपण तरी आपल्या पातळीवर ऐतिहासिक कारंजा टॉवरसाठी जे कार्य होऊ शकते ते करावे असे म्हटले.

यावेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी आश्वस्त करताना म्हटले की, ऐतिहासिक कारंजा टॉवर ही वास्तु बीड शहराची शेकडो वर्षांपासून असलेली ओळख आहे. ही वास्तू सदैव चांगली राहिली पाहिजे. तो आपला इतिहास आहे. आपल्या इतिहासाची साक्ष आहे. याकरिता तहसीलदार म्हणून माझ्याकडून जे काही कार्य होऊ शकते ते मी निश्चित करणार असे म्हटले.

# महाराष्ट्र शासनाचा समाज भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल राजू वंजारे यांचा जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने यथोचित सत्कार

बीड /प्रतिनिधी

गतवर्षी महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार आणि यावर्षी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे उत्कृष्ट संस्थेचा पुरस्कार निसर्ग सेवाभावी संस्थेचे संस्थापक येळंबघाट येथील रहिवासी असलेले जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात निस्वार्थ भावनेने समाजकार्यासाठी स्वतःला समर्पित केलेले राजू वंजारे यांचा राज्य सरकारने एक लक्ष रुपये देऊन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान केला. सलग दोन वर्ष मिळालेल्या या पुरस्कारामुळे बीड जिल्ह्याचे नाव महाराष्ट्रात उंचावल्याने जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करताना बीडचे निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, होम डिवायएसपी उमाकांत कस्तुरे, महापारेषण बीडचे कार्यकारी अभियंता वासुदेव लबासे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास स्वामी, सचिव वैभव स्वामी यांच्यासह व्यासपीठावरील मान्यवर दिसत आहेत.






माजलगाव :– पुनंदगाव सरपंच रूद्रा कुरे,ग्रामपंचायत सदस्य परमेश्वर मुळे,प्रल्हाद (बाळु) कुरे,दता कुरे यांनी राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी (शरद पवार) पक्षात,मोहन जगताप,सहाल चाऊस,दयानंद स्वामी यांचे उपस्थितीत प्रवेश केल्याबदल सर्वांचे स्वागत करताना.

# खासगी गाडी, सरकारी थाट! गटशिक्षणाधिकाऱ्याच्या कारवर महाराष्ट्र शासनाचा फलक

धारूर/प्रतिनिधी

खासगी वाहनास महाराष्ट्र शासन अशा नावाचा फलक लावण्यास बंदी असतानाही येथील गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर हे आपल्या स्वतःच्या गाडीला लाल अक्षरातील महाराष्ट्र शासन असा बोर्ड लावून अपघात स्थळातील गर्दीतून गाडी नेत होते. यावेळी पोलिस अधिकारी देविदास बाघमोडे यांनी विचारताच बेडस्कर यांनी महाराष्ट्र शासन बोर्ड काढून गुंडाळून ठेवला.



कोणताही सरकारी कर्मचारी अथवा अधिकारी असला, तरी त्याला आपल्या खासगी गाडीवर 'महाराष्ट्र शासन' नावाचचा फलक लावता येत नाही. याबाबत प्रादेशिक परिवहन खात्याकडून तसे जाहीर करण्यात आले आहे. सरकारी कर्मचारी आपल्या वाहनांवर 'महाराष्ट्र शासन' नावाची पाटी लावून पोलिस कारवायांपासून वाचण्यासाठी आणि टोलपासून सुटका मिळावी, तसेच रुबाब दाखवण्यासाठी वाहनांवर पोलिस, महाराष्ट्र शासन, केंद्र सरकार, आदी पाट्या सर्रासपणे लावल्या जातात. अशा वाहनांच्या आडून गैरकृत्य होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी सावधगिरीची बाब म्हणून परिवहन खात्याने महाराष्ट्र शासनाच्या स्वमालकीची वाहने वगळता खासगी वाहनावर 'महाराष्ट्र शासन लिहून व आतील भागात महाराष्ट्र शासन, नावाची लाल रंगाची पाटी लावण्यास मोटार वाहन अधिनियम १९८४ नुसार मनाई केली आहे. तसा आदेश जारी केला आहे. असे असताना ही केज येथील प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर आपल्या खासगी गाडीला लाल अक्षरात महाराष्ट्र शासनाचा फलक लावून सर्रास फिरतात, याचा उद्देश मात्र काही समजत नाही. गुरुवारी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास धारूर येथील घाटात टँकरचा अपघात झाला होता.याच दरम्यान बेडसकर हे वडवणी वरून धारूर कडे जात असताना गर्दीतून गाडी नेत असताना घटनास्थळी पोलीस निरीक्षकांनी विचारणा केली असता सदर वाहन हे खासगी असूनही त्यावर शासनाचा फलक का लावला आहे?आपण कोण आहात? असा सवाल उपस्थित केला. वाहन क्रमांक चक४४-ड-४०३७ ही गाडी बेडसकर यांच्या मालकीची असल्याची नोंद असून, ती कोणत्याही अधिकृत शासन यंत्रणेच्या नोंदणीत नाही . यावेळी पोलिस गर्दी हटवण्याच्या कामात असताना याचा फायदा घेत तिथून बेडसकर यांनी काढता पाय घेतला.

## ठाणे जिल्हा परिषदेचे संवेदनशील मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या कडून नादुरुस्त अंगणवाडया व शाळां संदर्भात बातम्याची दखल, गंभीर शाळांना स्वतः भेटी देणार!

कल्याण(संजय कांबळे)

आपल्या सक्रिय सहभागातून विविध योजना, अभियान, शासनाचे उपक्रम व इतर अनेक घटक तळागाळातील लोकापर्यंत पोहचवून ठाणे जिल्हा परिषदेला राज्यात प्रथम क्रमांकावर पोहचविणारे जिल्हाचे संवेदनशील, कर्तव्यनिष्ठ मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी जिल्ह्यातील 'अंगणवाडया व नादुरुस्त शाळा, यांच्या संदर्भात विविध दैनिकातून बातम्या प्रसिद्ध होताच याची तात्काळ दखल घेऊन या सर्व शाळांची पाहणी करण्याचे आदेश शाखा अभियंता यांना दिले असून अतिशय गंभीर अशा, शाळा व अंगणवाडया ची ते स्वतः विजीट करून पाहणी करणार आहेत, त्यामुळे त्यांच्या या कृतीचे नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे.

खरे तर, ठाणे जिल्ह्याला लाभलेले संवेदनशील, कर्तव्यनिष्ठ, प्रत्येक उपक्रमात, अभियानात किंवा शासनाच्या योजनेत स्वतः सक्रिय सहभागी होऊन आपल्या खांद्यावर जबाबदारी घेऊन ती समर्थपणे पार पाडणा-या,आणि यशस्वी नेतृत्व म्हणून उदयाला येत असलेले मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या प्रशासनाच्या विरोधात बातमी लिहायला मन धजवत नाही, कारण सतत काम करणाऱ्या, जिल्ह्यातील नागरिकांचा विचार करणा-या अशा नेतृत्वाला, प्रशासनातील वरीष्ठ अधिका-यांपासून ते खालच्या शिपाई पर्यंत सर्वानीच आपल्या कृतीतून साथ द्यायला हवी, इतकेच नव्हे तर, समाजातील बुध्दीजीवी वर्ग, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, समाजसेवक, समाजसुधारक, नागरिक यांनी ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राह्याला हवं,

परंतु इतक्या मोठ्या विस्तीर्ण अशा ठाणे जिल्ह्यात अजूनही काही सुधारणा होणे गरजेचे आहे म्हणून पत्रकार संजय कांबळे व त्यांच्या इतर पत्रकार मित्रांनी जिल्ह्यात अंगणवाडया व नादुरुस्त शाळांची सचित्र वस्तुस्थिती प्रसिद्ध केली,याची तात्काळ दखल सीईओ श्री घुगे यांनी घेऊन या विभागाचे शाखा अभियंता यांना तातडीने या सर्व शाळाची पाहणी करण्याचे आदेश दिले, इतक्यावरच न थांबता, त्यांनी पत्रकार संजय कांबळे यांना संपर्क साधून



जिल्ह्यातील ज्या शाळा, अंगणवाडया, गंभीर स्थितीत आहेत, अशा शाळांना मी स्वतः विजीट करणार असल्याचे त्यांनी सांगितले, तसेच अशा शाळांची यादी त्यांनी आपणांस देण्यास सांगितले.त्यामुळे अशा संवेदनशील, कर्तव्यनिष्ठ मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांना पाठिंबा देणे, त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे ही माझ्या सह आपल्या सर्वांची जबाबदारी, कर्तव्य, आहे.

# फाईल पूर्ण झाली नाही, तर घरकुलाचा पैसाही नाही! - सीईओ मेघना कावली

मुखेड ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील घरकुल योजनेत 'काहीही चालतं' हे दिवस आता संपलेत! लाभार्थ्यांची फाईल पूर्ण झाल्याशिवाय त्यांच्या खात्यात एक रुपयाही टाकू नका, असा थेट आदेश जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी अधिकाऱ्यांना दिला.



गुरुवारी पंचायत समितीमध्ये झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी घरकुल योजनेच्या संदर्भात अधिकार्यांची चांगलीच झाडाझडती घेतली. गावपातळीवर जाऊन लाभार्थ्यांच्या फाईली तयार करा, जिओ टॅगिंग प्रत्यक्ष जागेवर जाऊन करा, असे निर्देश देताना कामचुकार कर्मचाऱ्यांना खबरदारीचा इशाराही दिला.

कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भरवश्यावर घरकुल योजना!

या महत्त्वाच्या योजनेत शासकीय कर्मचारीच नाहीत! संपूर्ण कारभार कंत्राटी ऑपरेटरकडे आहे. संगणक बंद, कार्यालयातील काम बंद, मोबाईलवरूनच घरकुल योजना 'पुन्हा पाहा' सुरू आहे. परिणामी सामान्य नागरिकांची फरपट होत आहे.मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या स्थितीकडे गांभीर्याने लक्ष घालावे, अशी जनतेची मागणी आता जोर धरू लागली आहे.

अधिकाऱ्यांची हजेरी

या बैठकीस गटविकास अधिकारी चंद्रशेखर रामोड, सहायक गटविकास अधिकारी शिवाजी ढवळे, गटशिक्षणाधिकारी हमीद दौलताबादी, विस्तार अधिकारी, ग्रामसेवक व सर्व विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी हजर होते. मात्र, कामाचा हलगर्जीपणा आणि जबाबदारी टाळण्याची वृत्ती काही ठिकाणी अजूनही कायम असल्याचं चित्र उघड झालं.

# वडखळ पोलीसांची कौतुकास्पद कामगिरी ;अंमली पदार्थ गांजा जप्त

**गडब/सुरेश म्हात्रे**

**दिः २५/६/२५ रोजी सकाळी ११..०० वा.सुमारास वडखळ पोलीस ठाणे अंतर्गत कार्यरत पोलीस अधिकारी व पथक असे हद्दीत गुन्हे प्रतिबंध गस्त करत असताना डइख बँक वडखळ शाखे समोर आले असता यातील दोन इसम १)सुशांत गौरंग साहू, वय ४२ वर्ष रा रामभाऊ म्हात्रे चाळ,, रूम न ५ वडखळ मूळ. गाव-बनसिया, केदारपूर, सोरो जिल्हा. बालासोर राज्य. ओरिसा २) गौरंग पुरुषोत्तम साहू वय ६३वर्ष रा. अनु क्र १ प्रमाणे हे पोलीसांना पाहून अचानक घाबरून, त्यांच्या हातातील बॅग सह, लगबगिने डइख** बँकेच्या गल्लीतून निघून




जात असताना ह्यातील पोलीस पथकास संशय आल्याने त्यांचा पाठलग करून त्यांना जागीच थांबवून दोन पंचा समक्ष अंगझडती घेतली असता त्यांच्या ताब्यातील कापडी लगेज बॅग मध्ये पुढील प्रमाणे अंमली पदार्थ गांजा मिळून आला आहे. १एकूण ४ किलो ९२० ग्राम गांजा किंमत २४६०००/रू यातील नमूद दोन्ही आरोपीता विरुद्ध गु छउ्झड ऍक्ट १ अन्वये गुन्हा दाखल केला असून सदर गुन्ह्यात दोन्ही आरोपीना अटक करण्यात आली आहे. आरोपी सध्या पोलीस कोठडीत आहेत पुढील तपास वडखळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे करित आहेत.

# परभणीत भगवान जगन्नाथ रथ यात्रानिमित्त निघाली भव्य रथ यात्रा

## संकिर्तन दिंडीने वेधले नागरिकांचे लक्ष

परभणी/प्रतिनिधी

इस्कॉन शाखा, परभणीच्या वतीने भगवान जगन्नाथ रथ यात्रानिमित्त शुक्रवारी (दि. २७) शहरातून भव्य शोभायात्रा आणी संकिर्तन दिंडी काढण्यात आली. या भव्य शोभायात्रेने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.भगवान जगन्नाथ रथ यात्रेनिमित्त दरवर्षी इस्कॉन शाखा, परभणीच्या वतीने भव्य शोभायात्रा व संकिर्तन दिंडीचे आयोजन करण्यात येते. ही शोभायात्रा शनिवार बाजार परिसरातून निघून छत्रपती शिवाजी महाराज चौक - गांधी पार्क - नारायण चाळमार्गे भारतरत्न डॉ आंबेडकर पुतळा परिसरातील श्री मंगल कार्यालय परिसरात विसर्जित करण्यात



आली. या रथ व संकिर्तन यात्रेत महिला, पुरूष भाविक - भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# लायन्स क्लबच्या अध्यक्षपदी उदयराज डी. जैन; पदग्रहण समारंभ संपन्न

परभणी,दि.२७(प्रतिनिधी) : लायन्स इंटरनॅशनल लायन्स क्लब, परभणी चा ५६ वा पदग्रहण समारंभ बुधवार २५ जून रोजी अक्षदा मंगल कार्यालयात संपन्न झाला. या कार्यक्रमात पी. डी. जैन होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयाचे अध्यक्ष उदयराज डी. जैन यांनी अध्यक्ष म्हणुन शपथ घेतली तर उपाध्यक्ष ॲड. संजय डहाळे व सचिव म्हणुन दिलीप जोगड, कोषाध्यक्ष म्हणुन सतिष चौधरी यांनी शपथ ग्रहण केली.या समारंभाकरीता पीएमजेएफ ला. सुनील देसरडा, मल्टीपल कॉन्सील चेअरपरसन, छत्रपती संभाजीनगर हे पदग्रहण अधिकारी म्हणुन उपस्थित होते, तर प्रमुख अतिथी म्हणुन प्रा. इंद्रजीत भालेराव, प्रसिध्द लेखक व कवी रिजनल चेअरपरसन एमजेएफ ला. सौ. प्रिया ठाकुर, झोन चेअरपरसन एमजेएफ ला. शिवकुमारजी पुरे, माजी अध्यक्ष एमजेएफ ला. पंडीत बरदाळे आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमाकरीता ॲड. अशोक सोनी, सी.ए. गुजराथी, प्रदिप गोलेच्छा, गेंदमलजी बाठीया व परभणी शहरातील लायन्स पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लॉ. सुनील मुथा, ला. गौतम साखला, ला. विजयकुमार कुचेरीया, लॉ. ॲड. निरज पारेख यांनी विशेष परीश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ॲड. झेड. आर. मुथा व ॲड. सौ. प्रियंका विनयकुमारजी जैन यांनी केले.दरम्यान, उदयराज डी. जैन यांची लायन्स इंटरनॅशनल लायन्स क्लबच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल पी. डी. जैन होमिओपॅथीक वैदयकीय महाविद्यालयाचे सचिव अभयराज जैन, प्राचार्य डॉ. विजय दाभाडे तसेच समस्त संचालक मंडळ व सर्व कर्मचारीवृंद यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# सराफा दुकान फोडून दागिणे लंपास




नानलपेठ पोलिसांत गुन्हा दाखल

परभणी/प्रतिनिधी

शहरातील गांधी पार्क परिसरात असलेले गुरु गणेश ज्वेलर्स या दुकानाचे शटर उचकटून चोरट्यांनी ४ लाख ७७ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने लंपास केले. ही घटना शुक्रवार २७ जून रोजी सकाळी उघडकीस आली. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांवर नानलपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शुभम कांकरीया यांनी तक्रार दिली आहे. अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या दुकानाचे शटर उचकटून दुकानामधून ४ लाख ७७ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरुन नेले. दोन चोरटे सीसीटिव्ही कॅमेर्यात वैद झाले आहेत. घटनेची माहिती समजताच उपविभागीय पोलीस अधिकारी दिनकर डंबाळे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक विवेकानंद पाटील, नानलपेठ पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक गणेश कदम, सहाय्यक पोलिस निरिक्षक मारोती कारवार

# ठाण्यात अंबर इंटरनॅशनल शाळेत लवकरच 'इस्त्रो'च्या स्पेस ट्यूटर प्रोग्रामअंतर्गत प्रयोगशाळेची स्थापना

मुंब्रा ।प्रतिनिधी

ठाणे - ठाणे तसेच मुंबई महानगर क्षेत्रातील शालेय विद्यार्थ्यांना अंतराळ संशोधन क्षेत्राचे शिक्षण मिळावे, या उद्देशातून ठाण्यातील अंबर इंटरनॅशनल स्कूलमध्ये भारतीय अवकाश संशोधन संस्था अर्थात 'इस्रो'च्या स्पेस ट्यूटर प्रोग्रामअंतर्गत प्रयोगशाळेची स्थापना करण्यात येणार असल्याची माहिती शाळेचे संचालक लक्ष्मण कदम यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली. भावी अंतराळवीर तसेच विविध क्षेत्रातील तज्ज्ञ घडविण्याच्या मुख्य उद्देशातून ही प्रयोगशाळा सुरू करण्यात येणार असून मुंबई महानगर क्षेत्रातील ही पहिली प्रयोगशाळा असेल असा दावाही त्यांनी यावेळी केला.अंबर इंटरनॅशनल स्कूल, 'भारतीय अवकाश संशोधन संस्था' अर्थात इस्रोच्या स्पेस ट्यूटर प्रोग्राम अंतर्गत व्योमिका स्पेस अकॅडमी यांच्यात शनिवारी सामंजस्य करार



करण्यात आला आहे. याबाबतची माहिती शाळेचे संचालक लक्ष्मण कदम यांनी शनिवारी पत्रकार परिषद घेऊन दिली. यावेळी अंतराळ संशोधन क्षेत्राचे अभ्यासक डॉ. प्रतीक मुणगेकर, व्योमिका स्पेस अकॅडमीचे गोविंद यादव, शारदा एज्युकेशन सोसायटीचे सचिव डॉ. प्रदीप ढवळ, अंबर इंटरनॅशनल स्कूलचे संचालक लक्ष्मण कदम, शारदा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विलास ठुसे, कल्पेश जाधव, दिलीप त्रिपाठी यांच्यासह दूरदृश्यप्रणाली द्वारे इस्रोचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. टी एन सुरेशकुमार उपस्थित होते.ठाणे तसेच मुंबई महानगर क्षेत्रातील शालेय विद्यार्थ्यांना अंतराळ संशोधन क्षेत्राचे शिक्षण मिळावे या उद्देशाने या प्रयोगशाळेची निर्मिती करण्यात येणार आहे. महाराष्ट्रात अंतराळ संशोधन क्षेत्रासंदर्भात पायाभूत सुविधांचा अभाव असल्याने प्रतिभा आणि गुणवत्ता असूनही या क्षेत्रात राज्याचे प्रतिनिधित्व कमी दिसून येते. शालेय वयातच अंतराळ संशोधन क्षेत्राची ओळख करून देणारी विशेष पायाभूत सुविधा आणि मार्गदर्शन उपलब्ध करून दिल्यास या क्षेत्रात मराठी टक्का वाढेल, असे मत अंतराळ संशोधक क्षेत्रातील अभ्यासक डॉ. प्रतिक मुणगेकर यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र हे औद्योगिक आणि शैक्षणिकदृष्ट्या प्रगत राज्य असून देशाच्या अंतराळ क्षेत्रात मोठे योगदान देण्याची क्षमता असल्याचेही त्यांनी सांगितले. त्याचबरोबर शास्त्रज्ञ व संशोधकांचे मार्गदर्शन या माध्यमातून ठाण्यातील विद्यार्थ्यांना या प्रयोगशाळेचा फायदा होणार असल्याचा विश्वास प्रा.डॉ.ढवळ यांनी व्यक्त केला. तर अशा प्रयोगशाळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि विज्ञानाची आवड निर्माण होईल, असे मत इस्त्रोचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.टी. एन.सुरेशकुमार यांनी व्यक्त केले.

# छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजेश पाटील मोरे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये!

नायगाव ।प्रतिनिधी

देगाव येथील भूमिपुत्र आणि छावा युवा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजेश पाटील मोरे यांनी घुंगराळा येथे आयोजित एका विशेष कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अधिकृत प्रवेश केला. त्यांचा पक्षप्रवेश आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते आणि मा. शिवराज पाटील होटाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

सामाजिक प्रवासाचा ठसा: गेल्या चार वर्षांपासून छावा संघटनेत सक्रिय भूमिका बजावताना, राजेश पाटील मोरे यांनी विविध पदांवर काम केले. त्यांनी कार्यकर्त्यांमध्ये विश्वास निर्माण करत अखेर प्रदेशाध्यक्ष पदापर्यंतची घौडदौड पार केली. समाजकार्यातील त्यांची दृढ भूमिका आणि नेतृत्वगुण यामुळेच त्यांना एक सशक्त युवा नेता म्हणून ओळख मिळाली.नेतृत्व स्वीकार आणि



राजकीय दिशा: मागील विधानसभा निवडणुकीच्या काळात शिवराज पाटील होटाळकर यांच्याशी संपर्क झाल्यानंतर, त्यांच्या नेतृत्वाने प्रेरित होऊन मोरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या प्रवेशामुळे पक्षाच्या युवा गटाला नवसंजीवनी मिळणार असल्याची भावना पक्ष कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे.

उपस्थित मान्यवर:या प्रसंगी जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, प्रदेश सरचिटणीस वसंतराव पाटील सुगावे, युवक जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील शिंदे, माजी सभापती अशोक पाटील मुगांवकर, विलास पाटील ढगे, राजेश पाटील ढगे, योगेश पाटील ढगे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.